




# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील

www.godateer.com

RNI No.6331/62

REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026









* वर्ष ६५ वे * अंक ९६ * नांदेड * रविवार, दि. १२ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# नांदेड जिल्ह्यात भूकंपाचे धक्के

## नागरिकांना सतर्क राहण्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील नांदेड शहर व ग्रामीण भाग, अर्धापूर, हदगाव, हिमायतनगर या तालुक्यांतील काही गावांमध्ये शुक्रवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८:४५ वाजता भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली. त्यानुसार राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ८.४५ वाजता या धक्क्याची नोंद झाली असून या धक्कयाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ एवढी नोंदविण्यात आली आहे. याचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील शिरली गावाच्या उत्तरेला असल्याचे कळते.

शुक्रवारी जाणवलेला धक्का हा सौम्य प्रकारचा आहे. तसेच या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत




संबंधित तहसीलदार यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे.

याबाबत नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. याबाबत प्रशासनाशी आपण संपर्कात असून नागरिकांनी सतर्क राहावे, घाबरुन जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे. तर नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नागरिकांनी घाबरून न जाता सतर्क रहावे. तसेच गावात ज्या लोकांच्या घराचे छत पत्र्याचे आहे व त्यांनी पत्र्यावर आधारासाठी दगड ठेवले आहेत त्यांनी सुरक्षिततेचा भाग म्हणून त्वरित दगड काढून घ्यावेत व पत्रे बोल्टने फिट करून घ्यावीत. पुन्हा असा आवाज आलाच तर पटकन घराबाहेर मोकळ्या जागेत गोळा व्हावे व प्रशासनाला (०२४६२) २३५०७७ या क्रमांकावर संपर्क करून कळवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

### हिंगोलीत अनेकांच्या घराला तडे

हिंगोली जिल्ह्यांमध्ये शुक्रवारी सकाळी ८ वाजून ४७ मिनिटांच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. हिंगोली जिल्ह्यांमध्ये दरवेळेस भूकंपाचे धक्के जाणवत असतात. मात्र यावेळेसचा भूकंपाचा धक्का हा मोठ्या प्रमाणात असल्याचं नागरिक सांगत आहेत. भूकंपाचा धक्का जाणवल्यानंतर अनेक गावातील घरामध्ये ठेवलेली भांडी आणि वस्तू जमिनीवर कोसळून पडले आहेत. तर अनेकांच्या घराला तडे गेल्याची सुद्धा प्राथमिक माहिती समोर आली आहे. या भूकंपाचे अद्याप प्रशासन स्तरावर कोणतीही नोंद झाली नसली तरी प्रशासनाच्या वतीने या भूकंपाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. भूकंपाचे केंद्रबिंदू पांगरा शिंदे हे गाव आहे. या गावात भूकंपाची ४.७ रिश्टर स्केलची नोंद झाली आहे.

## राज्यात 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ' स्थापन होणार

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी राज्य सरकारने 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ, महाराष्ट्र' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही संस्था नवी दिल्लीतील पब्लिक हेल्थ फाऊंडेशन ऑफ इंडिया यांच्या सहकार्याने सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील आरोग्य क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि प्रशिक्षणासाठी ही संस्था केंद्रबिंदू ठरणार आहे. या संस्थेसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने १२० कोटी रुपये निधी मंजूर केला आहे.

सार्वजनिक आरोग्य संरक्षण करण्याच्या दिशेने महाराष्ट्र अग्रेसर आहे. या दृष्टीने अधिक अग्रेसर होण्यासाठी सार्वजनिक आरोग्य आणि आरोग्य व्यवस्थापन विषयात अधिक संशोधन करण्यासाठी आवश्यक मनुष्यबळाची आवश्यकता आहे. तसेच विविध क्षेत्रातील तज्ज्ञ उपलब्ध असणे आवश्यक आहे.

# महाराष्ट्र तापला! पारा ४० अंशावर!

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिवसेंदिवस राज्यात तापमानाचा पारा वाढत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या तापमानाचा मोठ्या प्रमाणात त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. राज्यात तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे गेला आहे. अनेक ठिकाणी ४० ते ४२ अंश तापमानाची नोंद झाली आहे.

राज्यात उष्णतेचा पारा चांगलाचा वाढल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक ठिकाणी तापमानाचा पारा ४० अंशाच्या पुढे तापमानाची नोंद झाली आहे. तापमाना वाढल्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. वाढत्या तापमानामुळे रस्त्यांवर लोकांची गर्दी दिसत नसल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

राज्यातील बहुतांशी भागांमध्ये पावसाला पोषक असलेले वातावरण निवळले आहे. काही भागात आजही ढगाळ हवामान होते. त्याभागात उकाडा जाणवत आहे. तर राज्यातील अनेक भागात तापमानात वाढ दिसून येत आहे. रविवारी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात ढगाळ हवामानाचा अंदाज आहे. या जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचाही अंदाज देण्यात आला आहे. तर राज्याच्या इतर भागातील तापमानात काहीसे चढ-उतार दिसून आले. राज्यातील तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवस राज्यात काही ठिकाणी अंशतः ढगाळ वातावरण राहून उकाडाही जाणवण्याची शक्यता आहे. इतर भागात मात्र तापमानात वाढ होऊन उन्हाचा चटकाही वाढण्याचा अंदाज आहे. कोकण आणि मराठवाड्यातील बहुतांशी भागात उष्णता वाढण्याची शक्यता आहे. शनिवारी राज्यातील सर्वाधिक तापमान अकोला येथे नोंदविले गेले. अकोल्यात ४०.१ अंश सेल्सिअस तापमान होते. तर देशातील सर्वाधिक तापमान आंध्र प्रदेशातील कुर्नूल येथे ४१.०४ अंश सेल्सिअस नोंदले गेले. कोकण विभागासाठीही यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईसह किनारपट्टी भागात उष्ण आणि दमट हवामान राहणार असून तापमान ३६ अंशांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. उकाड्यामुळे नागरिक त्रस्त होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, वाढत्या उष्णतेच्या काळात नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी, असं आवाहन करण्यात येत आहे.

### राज्यातील तापमानाची आकडेवारी

अकोला - ४२, अमरावती - ४१.०२, वर्धा - ४०.५, यवतमाळ - ४०.२, नागपूर - ३९.४, चंद्रपूर - ३९.८, मुंबई (सांताक्रुज) - ३४.६, रत्नागिरी - ३०, सोलापूर - ४१.४, अहिल्यानगर - ४०.१, सांगली - ४०.३, जळगाव - ४१, नांदेड - ४१.३, परभणी - ३९.४, नंदूरबार - ३९.७, नाशिक - ३८.८, पुणे - ३९, मालेगाव - ४१, संभाजीनगर - ३९.४.

## गायिका आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका, रुग्णालयात दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांना हृदयविकाराचा झटका आल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सध्या त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे.

चित्रपटसृष्टीत आपल्या आवाजाने जादू निर्माण करणाऱ्या दिग्गज गायिका आशा भोसले यांना ११ एप्रिल रोजी हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. ब्रीच कँडी रुग्णालयातील डॉक्टरांनी या वृत्ताची पुष्टी केली आहे, मात्र यापेक्षा अधिक माहिती अद्याप



उपलब्ध नाही.

आशा भोसले यांना हॉर्ट अटॅक आल्यानंतर पॅपराझी रुग्णालयाबाहेर पोहोचले आहेत, मात्र कुटुंबियांकडून त्यांना कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. या बातमीमुळे आशा भोसले यांच्या चाहत्यांमध्ये चिंता पसरली आहे. त्यांनी संगीत क्षेत्रात मोठे नाव कमावले असून त्यांच्या गाण्यांना लोकांकडून मोठी पसंती मिळते. त्या गेल्या ७० वर्षांहून अधिक काळ या क्षेत्रात सक्रिय आहेत.

आशा भोसले यांनी १९४८ साली सावन आया या गाण्याद्वारे आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, जे चुनरिया या चित्रपटातील गाणे होते. आतापर्यंतच्या कारकिर्दीत त्यांनी सुमारे १६००० गाणी गायली आहेत. त्यांनी केवळ हिंदीच नव्हे तर मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियन अशा अनेक भाषांमध्येही आपल्या आवाजाची छाप पाडली आहे.

## सिग्नलमध्ये बिघाड करुन सह्याद्री एक्सप्रेसवर दरोडा

**सातारा (प्रतिनिधी)–** सातारा जिल्ह्यात सह्याद्री एक्सप्रेसवर दरोडा पडला आहे. रेल्वेच्या सिग्नलमध्ये बिघाड करून प्रवाशांना लुटले आहे. मिरज लोहमार्ग पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु करण्यात आला आहे.

कोल्हापूरहून पुण्याला निघालेल्या सह्याद्री एक्सप्रेसवर कराड तालुक्यातील शेणोली स्टेशनजवळ दरोडा पडला आहे. सातारा व सांगली जिल्हा हद्दीपासून काही अंतरावर मध्यरात्री घटना घडली आहे.

## वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी; शरद पवारांच्या भाष्याचे राजकीय वर्तुळात पडसाद

**मुंबई (प्रतिनिधी)–** वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांची घुसखोरी झाल्याचे प्रतिपादन राज्यसभा खासदार आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केले. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित स्मरणिकेत शरद पवार यांच्याकडून याबाबत भाष्य करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायात ६० टक्के लोकांची मांडणी धर्मांध शक्तींना बळ देणारी असल्याचे मत शरद पवारांनी मांडले. दुर्दैवाने या प्रबोधनाच्या मार्गावर कुठेच महिला नसल्याची खंतही शरद पवार यांनी व्यक्त केली.

महिला अधिकाऱ्यांचे पहिले अखिल भारतीय साहित्य संमेलन शनिवारी दिल्लीत पार पडत पडले. या साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेत केंद्रीय मंत्री असताना महिलांसाठी वेगळे धोरण आखण्याची गरज तुम्हाला का भासली, यावरही शरद पवार यांनी भाष्य केले आहे.

दरम्यान शरद पवार यांच्या या भाष्यावर राजकीय वर्तुळात मोठे पडसाद उमटण्यास सुरूवात झाली आहे. काही नेत्यांकडून त्यांच्या या भाष्याचे समर्थन केले जात असताना दुसरीकडे भाजपसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर अनेक राजकीय नेत्यांनी जोरदार टीका केली आहे.

माझ्यावर काही व्यक्तींचा अत्यंत प्रभाव आहे. त्यातील एक म्हणजे माझी आई. त्याकाळी जिल्हा लोक बोर्डात महिला प्रतिनिधीसाठी एक जागा असायची. त्या जागेवरुन संपूर्ण जिल्ह्यातून माझी आई निवडून आली होती. तिचे वैशिष्ट्य म्हणजे ती एकही बैठक चुकवायची नाही. अभ्यास करुन जायची. त्याकाळी प्रवासाची साधने नसायची. खासगी मोटर सर्व्हिस होती, एसटी नसायची, असे शरद पवार यांनी म्हटले.

## युद्धविराम नाहीच, इस्त्रायलकडून पुन्हा भीषण हल्ल्यांना सुरुवात

**तेहरान (वृत्तसंस्था)–** इराण आणि अमेरिकेतील युद्धामुळे मध्य पूर्वेत तणाव निर्माण झाला होता, मात्र आता दोन्ही देशांचे नेते शांतता चर्चा करण्यावर सहमत झाले आहेत. लवकरच दोन्ही देशांमध्ये याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. मात्र दुसरीकडे इस्त्रायलने आक्रमक पवित्रा घेतला असून लेबनॉनवर भीषण हल्ल्यांना सुरुवात केली आहे. इस्त्रायलने हिज्बुल्लासोबत युद्धविराम (सीजफायर) नाकारला आहे. पुढील आठवड्यात वॉशिंग्टनमध्ये लेबनानच्या अधिकाऱ्यांसोबत होणाऱ्या चर्चेत हा मुद्दा घेतला जाणार नाही आणि हल्ले सुरूच आहेत.

## मंत्री छगन भुजबळ थोडक्यात बचावले, पुण्यात सुदैवानं हेलिकॉप्टरचा अपघात टळला



**पुणे (प्रतिनिधी)–** पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे हेलिकॉप्टर लँडिंगदरम्यान मोठी चूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे महात्मा फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी येथे येत होते. मात्र, नियोजित हेलिपॅडवर हेलिकॉप्टर उतरवण्याऐवजी पायलटने ते थेट कार पार्किंगच्या जागेत उतरवल्यामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमासाठी स्वतंत्र हेलिपॅडची व्यवस्था करण्यात आली होती. तरीही, खानवडी गावात पोहोचलेल्या हेलिकॉप्टरच्या पायलटला कार पार्किंगमधील मोकळी जागाच हेलिपॅड असल्याचा भास झाला आणि त्याने तिथेच लँडिंग केले. या अनपेक्षित प्रकारामुळे उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. पार्किंगमध्ये काही वाहने उभी असली तरी कोणालाही गंभीर दुखापत झाल्याची नोंद नाही.







**नांदेड–** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त नांदेड जिल्हा भाजपच्यावतीने फुले दाम्पत्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, महापौर कविता संतोष मुळे, आमदार श्रीजया चव्हाण, भाजपचे महानगराध्यक्ष अमरनाथ राजुरकर, उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे, नगरसेवक किशोर स्वामी, मिलिंद देशमुख, सतीश देशमुख, शितल खांडील, शांभवी साले यांच्यासह भाजपचे नगरसेवक उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवसेनेकडून पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर यांच्यासह शिवसेना पदाधिकारी दिसत आहेत. **(छाया : करणसिंह बैस)**

# एसआयआरमध्ये देशभरात ६.०८ कोटी मतदारांची नावे वगळली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** विशेष गहन पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेनंतर देशातील ९ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांच्या संयुक्त मतदार यादीत मोठी घट नोंदवण्यात आली आहे. या प्रक्रियेनंतर सुमारे ६.०८ कोटी मतदारांची नावे वगळण्यात आली असून एकूण मतदारसंख्या ५१ कोटींवरून ४४.९२ कोटींवर आली आहे.

उत्तर प्रदेशने अंतिम मतदार यादी जाहीर केल्यानंतर एसआयआर प्रक्रियेचा दुसरा टप्पा पूर्ण झाला आहे. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, राजस्थान, छत्तीसगड, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा तसेच पुदुचेरी, अंदमान-निकोबार आणि लक्षद्वीप या केंद्रशासित प्रदेशांच्या अंतिम मतदार याद्या प्रकाशित करण्यात आल्या आहेत. बिहारमध्ये ही प्रक्रिया यापूर्वीच पूर्ण झाली होती.

निवडणूक आयोग आणि संबंधित राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ ऑक्टोबर रोजी एसआयआर प्रक्रियेची घोषणा झाली तेव्हा या राज्यांतील एकत्रित मतदारसंख्या सुमारे ५१ कोटी होती. तपासणी आणि पडताळणीनंतर ती घटून ४४.९२ कोटींवर आली आहे.



देशातील एकूण ९९ कोटी मतदारांपैकी सुमारे ६० कोटी मतदारांना या मोहिमेत समाविष्ट करण्यात आले आहे. उर्वरित ४० कोटी मतदारांचा समावेश पुढील टप्प्यात १७ राज्ये आणि पाच केंद्रशासित प्रदेशांमध्ये केला जाणार आहे. या प्रक्रियेला संबंधित राज्यांतील विधानसभा निवडणुकांनंतर गती मिळण्याची शक्यता आहे.

टक्केवारीनुसार पाहता, गुजरातमध्ये सर्वाधिक १३.४० टक्के घट नोंदवली गेली असून उत्तर प्रदेश १३.२४ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. याशिवाय छत्तीसगड (११.७७ टक्के), पश्चिम बंगाल (११.६१ टक्के), तामिळनाडू (११.५५ टक्के), गोवा (१०.७६ टक्के), पुदुचेरी (७.५७ टक्के), मध्य प्रदेश (५.९७ टक्के), बिहार (५.९५ टक्के), राजस्थान (५.७४ टक्के) आणि केरळ (३.२२ टक्के) येथेही मतदारसंख्या घटली आहे.

उत्तर प्रदेशमध्ये या मोहिमेपूर्वी १५.४४ कोटी मतदार होते, जे आता १३.४० कोटींवर आले आहेत. लखनऊ येथे सर्वाधिक २२.८९ टक्के घट झाली असून पुरुषांसोबत महिला मतदारसंख्येतही घट दिसून आली आहे. तसेच, प्रारूप (ड्राफ्ट) यादीच्या तुलनेत अंतिम यादीत ८४.२८ लाख मतदारांची वाढही नोंदवली गेली आहे. लखनऊ, प्रयागराज, कानपूर, आग्रा आणि गाझियाबाद या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल दिसून आले आहेत.विधानसभा क्षेत्रांमध्ये साहिबाबाद, नोएडा, लखनऊ उत्तर, आग्रा कॅन्ट आणि इलाहाबाद उत्तर येथे सर्वाधिक मतदार घट नोंदवली गेली आहे.

दरम्यान, पश्चिम बंगालमध्ये एसआयआर प्रक्रियेदरम्यान सुमारे ९१ लाख नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत. फेब्रुवारी अखेरपर्यंत ६३.६६ लाख नावे वगळण्यात आली होती, मात्र अंतिम तपासणीनंतर ही संख्या वाढून सुमारे ९०.८३ लाखांवर पोहोचली आहे. निवडणूक आयोगाने ही कारवाई मतदार यादी अधिक अचूक आणि पारदर्शक करण्यासाठी करण्यात आल्याचे स्पष्ट केले आहे.

## इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराणचं शिष्टमंडळ पाकिस्तानी पंतप्रधानांच्या भेटीला

### इराणने चर्चेसाठी अमेरिकेपुढे ठेवल्या चार अटी तर इराणवरील निर्बंध हटवण्यास अमेरिकेचा नकार

**इस्लामाबाद (वृत्तसंस्था)–** इराणला पाकिस्तानामधील इस्लामाबादमध्ये सुरु असलेल्या चर्चेत मोठं यश मिळाल्याची चर्चा आहे. अमेरिकेकडून गोठवलेली मालमत्ता मुक्त करण्यास सहमती दर्शवल्याची माहिती एका वृत्तसंस्थेनं दिली आहे. त्यामुळे चर्चेच्या सुरुवातीलाच इराणने बाजी मारल्याचे चित्र आहे. त्यामुळे हा या युद्धातील एक मोठा 'टर्निंग पॉईंट' ठरू शकतो.

मिळालेल्या माहितीवरून, कतार आणि इतर विदेशी बँकांमध्ये असलेले ६ अब्ज डॉलर्स (सुमारे ५० हजार कोटी) मुक्त करण्यास अमेरिकेने सहमती दर्शवल्याची माहिती समोर आली आहे. 'हॉर्मुझची सामुद्रधुनी' उघडणे आणि तेल पुरवठा सुरळीत होण्यासाठी ही चर्चा अत्यंत महत्त्वाची आहे. १९७९ पासून आजपर्यंत (२०२६) इराणवर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात अमेरिकेचे निर्बंध आहेत. केवळ २०१६-१७ चा काळ असा होता, जेव्हा त्यांना थोडी सवलत मिळाली होती. त्यामुळे ४८ वर्षांच्या लॉकडाऊनमधून सुटका होणार आहे.

इस्त्रायलने इराणची अण्वस्त्र क्षमता पूर्णपणे नष्ट करण्यासाठी युद्ध सुरू केले होते. आता अमेरिकेने पैसे सोडल्यास इराणची आर्थिक स्थिती सुधारेल. मात्र, इस्त्रायलला भीती आहे की, हे पैसे मिळाल्यावर इराण पुन्हा एकदा हिजबुल्ला आणि हमाससारख्या गटांना मोठी आर्थिक मदत करेल. असे होऊ न देणे हे इराणच्या हाती असेल. ट्रम्प प्रशासन इस्त्रायलला विश्वासात न घेता परस्पर इराणशी करार करत असल्याचा आरोप इस्त्रायलमधील विरोधी पक्षांनी केला आहे.




# शेजारधर्म



आज बागेत गर्दी कमी होती. नेने, पाठक, कुलकर्णी आणि रेगे हे चौघे एकाच ऑफिसमधून निवृत्त होऊन एकाच एरियात रहायला आले होते. सकाळ आणि संध्याकाळ बागेत फिरून प्राणायाम, व्यायाम आणि थोड्या गप्पा करून घरी परतत असत. यातील नेन्यांची आणि कुलकर्णींची मुले लग्नानंतर परदेशी स्थायिक झाल्याने मिस्टर आणि मिसेस एवढेच त्यांचे कुटुंब! चौघांच्या बायकाही कधी कधी संध्याकाळच्यावेळी बागेत यायच्या, पण वृद्धावस्था आणि गुडघेदुखीमुळे फिरणे कमीच व्हायचे. मग चौघी मिळून तब्येतीच्या कुरबुरी, जोडीदारांच्या कागाळ्या उगाळत बसत. पाठक आणि रेगे यांना मुलीच असल्याने त्या लग्न करून आपापल्या घरी सुखात राहत होत्या. नाही म्हणायला एखाद्या शनिवार रविवारी आई वडिलांना भेटायला चक्कर मारत पण त्यांच्याही नोकऱ्यां, मुलेबाळे यामुळे त्यांना क्वचितच वेळ मिळत असे. मुली रहायला आल्या की पाठक आणि रेगेबाई बागेत येत नसत. आपल्या मुलींना चारीचीज करून खायला घालावे असे त्या ठरवत. परंतु नेने आणि कुलकर्णी यांची मुले परदेशात असल्याने वर्षातून एकदाच महिन्याची सुट्टी घेऊन भारतात येत. पण महिन्याभरात घरात त्यांचा वेळ कमीच जाई. मित्रमंडळ, नातेवाईक, भटकंती आणि हॉटेलिंग यातच महिना कधी संपून जाई तेही कळत नसे. त्यामुळे मुले आली काय आणि गेली काय असे त्यांना काही फरक पडत नसे. नाही म्हणायला नातवंडांचा मात्र त्यांना चांगला सहवास मिळत असे.

मुले आणि सुना आपल्या मुलांना वृद्ध आई-वडिलांकडे सोपवून फिरायला, शॉपिंगला जात. त्यामुळे आजी-आजोबांना नातवंडांशी खेळायला, गप्पा मारायला खूप आवडायचे. त्यांच्या सहवासात ते खुश असत. कारण त्यांना दटावणाऱ्या ममाडॅडापेक्षा लाड करणारे आजीआजोबा फार आवडत असत. चारी वृद्ध जोडप्यांचा वेळ एकमेकांच्या सहवासात चांगला जात असे. कोणी आजारी पडले की एकमेकाला मदत करायला ते नेहमी तत्पर असत.

एके दिवशी मात्र रेग्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. यांच्या पत्नीला काय करावे तेच कळेना! मुलींना फोन करू की वृद्ध मित्रांना कळवू की पहिले डॉक्टरांना फोन करू? इकडे रेगे छातीवर हात दाबून विव्हळत होते. तेव्हा मिसेस रेग्यांनी आधी डॉक्टरांना फोन करत सांगितले, डॉक्टर ताबडतोब या! माझ्या मिस्टरांना छातीत वेदना होत आहेत. चौघांही जोडप्यांचे फॅमिली डॉक्टर एकच असल्याने त्यापैकी कोणीही बोलवले की डॉक्टर हातातील काम टाकून पळत येत असत. येताना इतरांनाही फोन करून कल्पना देत. रेगे वहिनींनी डॉक्टरांना फोन करून आपल्या मुलीला फोन लावला पण तिचा फोन नॉट रिचेबल दाखवत होता. त्या मनाने घाबरून गेल्या होत्या. इतक्यात पाठक, कुलकर्णी धावतच आले. कारण डॉक्टरांनी पोहोचेपर्यंत त्यांच्या छातीवर हाताने दाब देण्याचे सांगितले होते. रेग्यांची अवस्था पाहवली जात नव्हती. वेदनेने ते अक्षरशः तळमळत होते. कुलकर्णी पुढे आले आणि रेग्यांच्या छातीवर आपले दोन्ही हात एकावर एक ठेवून दाब देऊ लागले. पाच मिनिटात डॉक्टरही तिथे पोहचले. त्यांनी रेग्यांना वेदनाशामक इंजेक्शन दिले आणि म्हणाले, रेगे, तुम्हाला माईल्ड हार्ट अटॅक आला होता परंतु आता चिंता करण्याचे काही कारण नाही. तुम्ही आराम करा. मी लिहून दिलेली औषधे वेळेत खा एवढे सांगून डॉक्टर जायला निघाले. रेगे वहिनी डॉक्टरांचे पुन्हा पुन्हा आभार मानत होत्या.

थोड्या वेळाने रेग्यांना थोडाफार आराम पडला. रेगे वहिनींच्या जीवात जीव आला. त्यांनी मुलीला पुन्हा फोन लावला. आता मात्र मुलीने फोन उचलला रेगेवहिनी म्हणाल्या, अगं अनिता तू कुठे आहेस? तुला मी कधीपासून फोन करत होते परंतु तुझा फोन नॉट रिचेबल येत होता. आईचा फोन ऐकून रेग्यांची मुलगी ही काळजीत पडली. तिने विचारले, आई तुम्ही सर्व व्यवस्थित आहात ना? का फोन केला होतास? तसे रेगेवहिनी रडकुंडीला येत म्हणाल्या, अगं तुझ्या बाबांची तब्येत अचानक बिघडली पण तू काळजी करू नकोस. डॉक्टरांनी इंजेक्शन, औषध दिल्याने आराम पडला आहे. आपल्या कुलकर्णी आणि पाठक भाऊजींनी खूपच मदत केली. ऑफिस सुटल्यावर तू आरामात ये. सगळे काही ठीक आहे अनितालाही बाबांची तब्येत ठीक असल्याचे ऐकून बरे वाटले. तिने आईला ऑफिस सुटल्यावर येते असे सांगत फोन खाली ठेवला. रेग्यांना औषधामुळे झोप लागली. तसे कुलकर्णी आणि पाठक त्यांना म्हणाले, वहिनी तुम्ही काही खाल्ले आहे का? त्यांनी नाही असे सांगताच कुलकर्णींनी आपल्या पत्नीला फोन करून रेगे पतीपत्नीसाठी जेवण घेऊन यायला सांगितले.


चौघांचीही आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्यांनी घरकामासाठी मोलकरणी ठेवल्या होत्या. पुढील पंधरा मिनिटात कुलकर्णीबाई गरम गरम जेवणाचा डबा घेऊन पोहोचल्या.

रेग्यांनाही जाग आली होती. सर्वांनी आग्रह करून रेगे पती-पत्नींना जेवण खायला लावले. दोघांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते. आपल्या मित्रांची आज आपणास किती मदत झाली याचा विचार मनात येऊन रेग्यांनी आपले हात जोडले आणि म्हणाले, अरे दोस्तांनो, फार धन्यवाद !आज तुम्ही नसता तर माझी अवस्था फार बिकट झाली असती. तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही. तसे तिघेही दोस्त म्हणाले, अहो रेगे, धन्यवाद कसले करताय! आपण एकमेकांसाठी नाही करायचे तर कोणी करायचे? वेळ आणि प्रसंग सर्वांवर येऊ शकतो. पाठक म्हणाले, गेल्या वर्षी माझ्या पत्नीची तब्येत खराब झाली तेव्हा तुम्ही किती पळापळ केली होती आणि कुलकर्णींचा बाईक अपघात झाला तेव्हा आपणच त्यांना डॉक्टरांकडे नेले होते. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ असे म्हणून रेगे पती-पत्नींना आराम करायला सांगून सर्वजण आपापल्या घरी गेले.

रेगे पती-पत्नी आपल्या मित्रांच्या सहकार्याने भारावून गेले होते. आज रेग्यांना हृदयविकाराचा लहान झटका येऊन गेला होता पण प्रसंगावधान राखून पत्नीने डॉक्टरांना फोन केल्याने त्यांचे जीवावरचे संकट टळले होते. तसे मित्र आणि त्यांच्या बायकांनी त्यांना जेऊ घातले, सांत्वन केले. रेग्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. ते आपल्या पत्नीचा हात हातात घेऊन म्हणाले, रेणू आज तुझ्यामुळे माझा जीव वाचला. तुझे मानावेत इतके उपकार कमीच! तसे रेगे बाई म्हणाल्या, अहो उपकार कसले? मी तर माझे कर्तव्यच केले. माझ्या कुंकवासाठी मी इतकेही नाही करायचे तर मनुष्य धर्माचा उपयोग काय? भारावलेल्या मनाने दोघे बसले असतानाच अनिता, त्यांची मुलगी धापा टाकतच घरी पोहोचली. आपल्या बाबांना सुखरूप पाहून ती आनंदाने आईच्या गळ्यात पडून रडू लागली. तिचे डोळे पुसत रेणुताई म्हणाल्या, अग वेडे! आता तुझे बाबा ठणठणीत आहेत मग रडतेस कशाला? डोळे पूस आणि काहीतरी खाऊन घे अनिताने येताना आईबाबांसाठी फळे, मिठाई, ड्रायफ्रूट्स आणले होते. ते आपल्या हाताने तिने बाबांना भरवले. आपल्या लेकीचे आपल्यावरील प्रेम पाहून वृद्ध दांपत्य सुखावले. मुलगी जन्माला आली तेव्हा वंशाला दिवा नाही म्हणून अनेक लोकांनी रेग्यांना टोमणे मारले होते पण आज तीच मुलगी वृद्ध आई-वडिलांची तब्येत बरी नसल्याचे कळताच धावत आली होती. आपल्या आई-बाबांची ती काठी झाली होती. रेणूताईंना आपल्या लेकीचा खूप अभिमान वाटला.आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटत त्यांनी पदराने आपले डोळे पुसले आणि तिला खाण्यासाठी काही बनवावे म्हणून उठून स्वयंपाकघरात गेल्या.

**-सौ. भारती सावंत**
खारघर, नवी मुंबई
मो. ९६५३४४५८३५

# युगाची वेदना विश्वव्यापी करणारी नारायण सुर्वे यांची कविता




एखादी साहित्यकृती वाचताना त्यातील व्यक्तिरेखेशी नाते जुळून जाते. ती व्यक्तिरेखा मनात कायमची घर करून बसते. मग माणूस त्या व्यक्तीत्वाच्या प्रेमात पडतो. ती व्यक्तिरेखा जीवनाच्या अनेक चढउतारात कायमची प्रेरणादायी व मार्गदर्शकही ठरत असते. अशा काही व्यक्तिरेखा आयुष्यातील अनेक भल्याबुऱ्या आठवणींना उजाळा देत असतात. त्या अनुभवांच्या आठवणीची शिदोरी आयुष्यात कधी कधी कामी येते. पुढे पुढे चालणाऱ्यांना प्रेरणादायी मंत्र देते. तेव्हा ती व्यक्तिरेखा एकटी चालत नसून समदुःखी लोकांना सोबत घेऊन मार्गक्रमण करत असते. तेव्हा ती कलाकृती सकारात्मकतेचा संदेश देणारी ठरते. अशा एक किंवा अनेक साहित्यकृतील व्यक्तीरेखेत कधी कधी अनेकांची संघर्षे असतात. काही साहित्य सामाजिक मूल्यांसाठी संघर्ष करत असतात. त्यातील कांही साहित्यकृती वाचकांच्या मनातल्या गोष्टीचे प्रतिनिधित्व करत असतात. अशा सगळ्या साहित्यकृती वाचकांना, अभ्यासकांना आणि समीक्षकांना भावलेल्या असतात. म्हणून वाचक त्या साहित्यकृतींवर प्रेम करत असतो. समीक्षक तिचे कौतुक करतो. तसेच अभ्यासक मात्र तिच्या अनेक पैलूवर भाष्य अथवा अभ्यासपूर्ण लेखन करतात.

एखादा साहित्यिक अनुभवाच्या आधारे साहित्यकृतीचे मूल्यमापन, विश्लेषण आणि तात्त्विक परामर्श मांडतो. त्या कलाकृतीच्या बाबतीत चर्चा करतो. म्हणजेच समीक्षक वाचकाला साहित्यकृतीतील नवीन पैलू आणि सौंदर्य समजावून सांगत असतो. अशा पद्धतीने अभ्यास केल्यास एका व्यक्तीच्या विविध वाययकृतीतील अनेक साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, वैयक्तिक आणि शैक्षणिक गोष्टींशी असलेल्या सहसंबधास 'वाड्.मयाभ्यास' म्हणता. या एकंदरीत सगळ्या गोष्टींचा विचार करून डॉ. व्यंकटी पावडे यांनी नारायण सुर्वे यांच्या बहुआयामी कवितेचा चिंतनात्मक अभ्यास केला. त्यातून नारायण सुर्वे यांची चिंतनशील कविता ह्या समीक्षा ग्रंथाची निर्मिती झाली.

या ग्रंथाच्या अभ्यासासाठी त्यांनी बाराव्या शतकातील महानुभावीय कवितेपासून ते मंगेश पाडगावकर यांच्या कवितेपर्यंतच्या सर्व कालखंड व कवितांचा अभ्यास केला. त्यातूनच त्यांना नारायण सुर्वे यांच्या कवितेचे सूत्र व मोल सापडले असावे असे वाटते. बाराव्या शतकात महानुभाव संप्रदायाचे प्रणेते श्रीचक्रधर स्वामी यांनी लीळाचरित्र हा ग्रंथ लिहिला. भक्तीच्या आधारावर मोक्षप्राप्ती अशा वाङ्मय निर्मितीतून मराठी काव्य समृद्ध केले. बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची निर्मिती झाली.त्यात नामदेव आणि ज्ञानदेव या दोन संतांनी वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान अभंगाद्वारे मांडले. जातीय विळख्यात अडकलेल्या अठरापगड जातीतील लोकांना विठ्ठल भक्ती, टाळमृदंग व अभंग यांच्या साह्याने एकत्र केले.

संत गोरा, संत सावता, संत सेना, संत जोगा, संत परमानंद, संत चोखा, संत कर्ममेळा, संत विसोबा, संत बंका, संत मुक्ताई, संत जनाबाई, संत कान्होपात्रा या सर्व संत मंडळींनी आपल्या कवितेद्वारे समाजाच्या उद्धाराचे कार्य केले. त्यांनी कविता व अभंगातून तेराव्या व चौदाव्या शतकातील समाज जीवनाचे चिंतन केले. ही गोष्ट मराठी कवितेत मोलाची भर घालणारी होती.

पंधराव्या शतकातील मोघलांच्या राजवटीत एकनाथ महाराजांनी एकनाथी भागवत,रुक्मिणी स्वयंवर, भावार्थ रामायण, भारूडे आणि गौळणी निर्माण करून मराठी भाषाचे वैभव वाढविले. भारूडे यांच्या माध्यमातून हिंदू जनजागृती केली. या काळात संत मंडळींनी केलेली वाङ्मयीन कामगिरी अस्तित्वाचा मार्ग दाखवणारी होती.

सोळाव्या शतकात रंजलेल्या व गांजलेल्या लोकांची सेवा म्हणजे ईश्वरी सेवा अशी तुकाराम महाराज यांची धारणा होती. त्यांची कविता समाजातील दंभ व ढोंग यावर अभंगाच्या माध्यमातून प्रखड टीका करणारी होती.

अलीकडे ब्रिटिशांच्या काळात पेशव्यांच्या अंत झाला त्यानंतर भारतात इंग्रजी अमलातून नवीन भाषेचे दारे मोकळी झाली. परंपरागत कवितेला दूर सारत भाषांतर कवितेचे दिवस आले.

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात महात्मा फुले यांनी सत्य धर्माची स्थापना केली. त्यांनी दंभ, ढोंग नशीब, आत्मा आणि परमात्मा या गोष्टीवर टीका केली.महात्मा फुले यांची कविता विज्ञानवादी आणि परिवर्तनवादी विचारसरणी स्वीकारणारी होती. त्याचबरोबर सावित्रीबाई फुले यांनी काव्यफुले ,बावनकशी सुबोध रत्नाकर या काव्यसंग्रहातून तत्कालीन चालीरीती ,अंधश्रद्धा ,परंपरा आणि कुकर्मावर प्रहार केले.

केशवसुताने मराठी कवितेचे अंतरंग बदलून टाकले. नव्या जाणीवा, नवीमूल्ये सुनीत याससारखा काव्यप्रकार मराठीत आणला. व्यक्तिगत भाव-भावनापेक्षा सामाजिक भावनांना महत्त्व दिले. अभिव्यक्ती संदर्भात अभूतपूर्वक क्रांती केली. काल्पनिकतेपेक्षा वास्तववादी आणि चिंतनशील कविता मराठीत निर्माण केली. त्याचबरोबर गोविंदाग्रज ,कवी बी आणि रविकिरण मंडळातील माधव ज्युलियन यांनी काव्य समृद्ध केले.

वि.दा. करवंदीकर यांनी काव्यात मुक्तशैलीचे प्रयोग केले. त्यांची कविता हिंदुत्वाकडून समाजवादाकडे व समाजवादाकडून साम्यवादाकडे प्रवास करते.

डॉ. व्यंकटी पावडे यांनी वेगवेगळ्या कालखंडातील कविच्या कवितेचे तात्कालिक परिस्थितीचे अभ्यासपूर्ण चिंतन पहिल्या प्रकरणात मांडले. त्यातून वरीलप्रमाणे कालखंड व कवी यांच्या कवितेची संक्षिप्तता लेखातून मांडता आली.

**पुस्तक परीक्षण**
**व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२

या कालखंडातील कवितेचा विचार केला तर कष्टकरी कामगारावर काव्य निर्मिती झालेली दिसत नाही. या संपूर्ण कालखडात संत साहित्य व मोजक्या कविंच्या कवितेचा विचार केला तर कामगार धर्माची कविता उपेक्षित राहीली की काय असे वाटते. कामगारांच्या ज्वलंत वेदनेतून प्रसवलेली नारायण सुर्वे यांची संवेदनशील कविता अनेक कालखंडात विकसित होत गेलेल्या कवितेपेक्षा वेगळी आणि काळजात घर करणारी वाटते. म्हणूनच डॉ व्यंकटी पावडे यांनी नारायण सुर्वे यांची चिंतनशील कविता हा विषय अभ्यासासाठी निवडलेला असावा असे वाटते.

त्यांनी नारायण सुर्वे यांच्या कवितेच्या अभ्यासासाठी मराठीतील वास्तववादी कवितेचा उदय व विकास यातूनच मराठीतील वास्तववादी कवितेचा उदय व विकास, नारायण सुर्वे व्यक्ती आणि वायय, कवितेतील जीवनसंघर्ष विषयक चिंतन, कवितेतील माणसांचा शोध, कवितेची भाषाशैली आणि नारायण सुर्वे यांच्या काव्यप्रतिभेचे वेगळेपण या सहा प्रकरण त्यांनी या शोध ग्रंथाच्या अभ्यासासाठी घेतले आहेत.

नारायण सुर्वे व्यक्ती आणि वायय या दुसऱ्या प्रकरणातून डॉ व्यंकटी पावडे यांनी एकंदरीत वास्तववादी मतीतार्थ मांडलेला आहे.

**जीवनसंघर्ष:** जन्मता अनाथ सुर्वे अशिक्षित लोकांच्या वस्तीत राहत होते. त्यांची एक वेगळी संस्कृती होती. दिवसभर काम आणि रात्री दारूची नशा अशी दिनचर्या असलेले व नैतिकमूल्य नसलेले लोक तेथे राहात होते. खेळण्या बागडण्याच्या वयात त्यांचे वैयक्तिक जीवन जबाबदारी, हालापेष्टा व वेदनादायी कष्टाने भरलेले होते. अपसूकच त्यांच्या वाट्याला अनेक संघर्ष आले. त्या सगळ्यात मोठा संघर्ष हा उपासमारीचा होता. त्यांच्या वाट्याला आलेल्या संघर्षाचे त्यांनी काव्यरूपाने प्रकटन केले. श्रमाचे अवमूल्यन करणाऱ्या भांडवलशाही विरोधात त्यांची कवितेच्या माध्यमातून विद्रोह केला.

रोजीचा रोटीचा सवाल रोजचाच आहे
कधी फाटका बाहेर कधी फाटका आत आहे.
कामगार आहे मी तळपती तलवार आहे.
किंवा
दोन दिवस वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दुःखात गेले.
हिशोब करतो आहे आता किती राहिले डोईवर उन्हाळे शेकडो वेळा चंद्र आला, तारे फुलले, रात्र धुंद झाली. भाकरीचा चंद्र शोधण्यात जिंदगी बर्बाद झाली. जीवनसंघर्षा बाबतीत असे विस्तृत विचार या समीक्षा ग्रंथात आलेले आहेत.

**माणसांचा शोध:** नारायण सुर्वे यांनी माणसाचे सुख-दुःख,भाव- भावना त्यांच्या मनातील भावांदोलने मांडण्याचा प्रयत्न केला. कवितेतून प्रकट झालेला माणूस विशुद्ध , व्यक्तिगत भावबंधनात अडकलेला खाजगी दुःखाभोवती फिरणारा होता. त्यांची कविता माणसांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे. त्यामुळे ती कविता सर्वसमावेशक व विश्वव्यापी झाली.

अविरतपणे नारायण सुर्वे यांनी माणसाच्या जीवन संघर्षाचा शोध घेतला. अनेक कालखंडापासून कवितेस अपरिचित असलेल्या दुर्लक्षित माणसांचा शोध घेणारी त्यांची कविता वाटते. नारायण सुर्वे यांच्या कवितेतील माणसाचा शोध या प्रकरणात लेखकांनी नारायण सुर्वे यांच्या सभोवताली असलेल्या माणसांच्या दुखांचे अंतरंग मांडलेले आहे.

कवितेची भाषाशैली: नारायण सुर्वे यांची कविता अभिव्यक्तीचे भाषिक सौंदर्य निर्माण करणारी आहे. त्यांनी सहज सोप्या भाषेने कवितेला जिवंत केले आहे.

त्यांच्या कवितेतील भाषा भावूक, हळवी ,प्रेमळ, जीवनवादी, विद्रोही, कठोर ,बंडखोर ,क्रांतिकारी आणि वास्तवाशी जवळीकता साधणारी आहे. तिला स्वतःची एक वेगळी लय आहे. आरोह-अवरोह उपमा, प्रतिमा व संवाद कथनात्मक यातून ती हृदयाला भिडते तशी ती मेंदूला विचार करायला शिकवते. त्यांच्या भाषेत व्यापक जन जीवनाची सखोल जाणीव आहे. त्यांच्या भाषेची धार तिखट असली तरी सामान्याच्या मनातील वेदना ती सहजपणे मांडते. अनुभवांना कलात्मक पण चिंतनशीलपणे मांडून वाचकांचे लक्ष वेधून घेते. डॉ.व्यंकटी पावडे यांनी या ग्रंथात सुर्वे यांच्या कवितेतील भाषाशैली या बाबतीत भाष्य केले आहे.

**काव्यप्रतिभेचे वेगळेपण:** नारायण सुर्वे यांची कविता संस्कृती,तत्त्वज्ञान, प्रेम, अध्यात्म, स्तुती आणि परंपरा मंडणारी मुळीच नाही. तर ती कामगारांच्या जीवनविश्वात अडकलेली आणि त्याच वर्तुळात फिरणारी आहे. आत्मकरूणेने भरलेली, कामगारांच्या अतिव जिव्हाळ्याने प्रगटलेली आहे. कामगारांच्या प्रश्नांकित समग्र जीवन त्या कवितेत आहे.

रंजलेल्या- गांजलेल्या उपेक्षित कामगार वर्गाच्या भुकेचा प्रश्न नारायण सुर्वे यांनी कवितेतून उजागर केला. त्यांची कविता प्रस्थापित भांडवलशाहीच्या विरोधात बंड करणारी होती. भांडवलशाहीच्या कचाट्यात अडकलेल्या सामान्य माणसाला दिलासा व ध्येर्य देणारी होती. लोकांच्या गरजा आणि भुक यांचा ताळमेळ बसत नसलेल्या काळात त्यांच्या जगण्यातला आशावाद वाढवणारी होती. सुर्वे यांची कविता जातपात विरहित कामगाराच्या प्रश्नातून श्रमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी होती. त्यांना भविष्यातील स्वप्नासाठी जागृत करणारी होती. अनेक संघर्षातून सशक्त झालेली त्यांची कविता लोकाभिमुख होती. संघर्ष, उपेक्षा,भुक आणि दारिद्र्य यातून भविष्याकडे भावनिक व चिंतनशीलपणे पाहणारी होती. नारायण सुर्वे यांनी सामाजिक दुःख हे आपले दुःख समजून वेदनेच्या नानाविध कळा कवितेतून मांडल्या वेदना विश्वव्यापी झालेल्या आहेत. डॉ. व्यंकटी पावडे यांनी मानवकेंद्री, उपेक्षित, दारिद्र्यी, भुकेल्या समाजिक प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या नारायण सुर्वे यांच्या कवितेचे लोकोपयोगी अनेक पैलू उलगडून त्या कवितेचे तत्कालीन महत्व आणि सद्य स्थितीत सामाजिक मोल निश्चितच या ग्रंथातून वाढवले आहे.

**समीक्षा ग्रंथ: नारायण सुर्वे यांची चिंतनशील कविता**
**लेखक: प्रा.डॉ.व्यंकटी पावडे**
**मुखपृष्ठ: सरदार**
**पृष्ठे:२७२**
**किंमत:३००/-**

# प्राचार्य मनोहर सोनटक्के : एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

परभणी जिल्ह्यातील आलेगाव या ग्रामीण भागात प्राचार्य सोनटक्के यांचा जन्म झाला. ८ ऑक्टोंबर १९४१ ही सरांची जन्मतारीख! चौथीपर्यंतचे शिक्षण आपल्या आजोळी म्हणजेच गंगाखेड तालुक्यातील बनवस येथे झाले. आलेगाव या गावाला जवळचे मोठे शहर म्हणजे पूर्णा जंक्शन हे होय. येथे अभिनव विद्या विहार नावाची एक नामांकित शाळा होती. आजही आहे. त्यांचे या शाळेत पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण झाले. त्याकाळी दहावीनंतर अकरावी, बारावी हा प्रकार नव्हता. वरिष्ठ महाविद्यालयाची पहिली पायरी म्हणजे पी.यू.सी. चा वर्ग ! फक्त एका वर्षाचा हा अभ्यासक्रम होता.



जून १९५९ मध्ये ते नांदेड येथील नामांकित अशा पीपल्स महाविद्यालयात पी.यू.सी. वाणिज्य शाखा या वर्गाला प्रवेश घेतला. त्यानंतर पदवीकरिता ही वाणिज्य शाखेची निवड करून जून १९६३ मध्ये पदवीधर झाले. त्यांच्या शिक्षणामध्ये मात्र कधीच खंड पडला नाही ते लगेचच जून १९६३ मध्ये औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात एम. कॉम. ला प्रवेश घेतला आणि दोन वर्षांत हा अभ्यासक्रम पूर्ण केला. पूर्वीच्या काळी बेकारी नव्हती असे मात्र म्हणता येत नाही. मात्र प्राचार्य सोनटक्के यांना लगेचच जून १९६५ मध्ये देगलूर महाविद्यालयाच्या वाणिज्य विभाग प्रमुखपदी अधिव्याख्याताचे पद मिळाले. त्यावेळी मराठवाड्यातील सर्व महाविद्यालये औरंगाबाद येथील मराठवाडा विद्यापीठाशी (सांप्रत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) संलग्नित होते. या विद्यापीठातील वाणिज्य शाखेसी संबंधित अभ्यास मंडळावर

१९८३ मध्ये पूर्णा शहरातील कांही प्रतिष्ठित मंडळींनी श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयाची स्थापना केली. यामध्ये श्री गुरु नंदिकेश्वर शिवाचार्य महाराज, डॉ. दत्तात्रय वाघमारे, सीताराम अप्पा एकलारे, उत्तमराव कदम, भुजंगराव कदम, श्रीनिवास काबरा, साहेबराव कदम, डॉ. नंदकुमार चौधरी, मन्मथअप्पा महाजन, रंगनाथराव कोत्तावार अशा काही प्रतिष्ठित मंडळीने गुरु बुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक या नावाची संस्था स्थापन केली आणि या संस्थेअंतर्गत श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय या नामाभीधानाने महाविद्यालय सुरू केले.

या महाविद्यालयाचा पहिला विद्यार्थी पांडुरंग भुताळे तर पहिले प्राचार्य मनोहर सोनटक्के हे होत. पांडुरंग भुताळे हे सुरुवातीला शासकीय सेवेत कार्य केल्यानंतर याच महाविद्यालयात लोकप्रशासन विभाग प्रमुखपदी कार्यरत होते व अनेक पुस्तकांचे लेखन करून वक्तृत्व व शैक्षणिक कार्यात नामांकित झाले. मात्र याचे सर्व श्रेय स्वतः प्रा. भुताळे हे प्राचार्य सोनटक्के व येथील गुरुजनांना देतात हे विशेष!

प्राचार्य सोनटक्के हे १९८३ मध्ये पूर्णाला आले आणि २००१ मध्ये सेवानिवृत्त झाले. मात्र त्यांच्या सेवाकार्य काळात व सेवानिवृत्तीनंतरही त्यांनी केलेल्या कार्याचे पडसाद आजही दिसून येतात. ते कार्यरत असतानाच महाविद्यालयातील कितीतरी विद्यार्थी आपले शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्राध्यापक, वकील, न्यायाधीश तसेच अन्य प्रशासकीय सेवेत रुजू झाले होते. या महाविद्यालयाचे विद्यार्थी दशरथ ईब्बत्तवार हे परभणीच्या ज्ञानोपासक महाविद्यालयात विभाग प्रमुखपदी रुजू झाले, त्यांचे एकूण ५० शोध निबंध असून हिंदी भाषेमध्ये आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्येही त्यांच्या काही पुस्तकांचा संदर्भ ग्रंथ म्हणून समावेश झालेला आहे. काही दिवसापूर्वी नांदेड येथे संपन्न झालेल्या साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे संशोधन प्रशिक्षण संस्था, मुंबईच्या वतीने संपन्न झालेल्या अधिवेशनाचे प्रा. दशरथ ईब्बतवार हे अध्यक्ष होते.

दुसरे विद्यार्थी पांडुरंग भुताळे यांनी विद्यार्थी जीवनात कला शाखेतील प्रतिकात्मक तर्कशास्त्र या विषयात शंभर पैकी ९१ मार्क मिळवून त्यांचे शिक्षक प्रा. मठवाले यांचा पराभव केला. पुढे पुढे तर अनेक विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण घेऊन मोठे यश संपादन केले. पराभव म्हणण्याचे कारण एवढेच की विद्यार्थी जीवनात प्रा. मठवाले यांनाही एवढे गुण प्राप्त झाले नव्हते. विद्यार्थ्याने केलेल्या या पराभवात किती अप्रतिम आनंद असतो हे सांगणे नकोच!

तत्कालीन प्रकाश पवार नावाच्या विद्यार्थ्यांमध्येही वक्तृत्वाचे किरण प्रकर्षाने दिसून येत होते. देगलूर तालुक्यातील होट्टलसारख्या ग्रामीण भागातून आलेला हा विद्यार्थी वक्तृत्वामध्ये अत्यंत सरस होता. शिक्षण झाल्यानंतर सुरुवातीला पोलीस विभाग व त्यानंतर शिक्षणाच्या क्षेत्रात येऊन आपले नाव कमावले. राजाराम शिंदे, सावरगावे, हुतात्मा पानसरे महाविद्यालयात कार्यरत असलेले प्रा. बाबू नाईक, ग्रामीण महाविद्यालय, वसंतनगर येथे कार्यरत असलेले प्रा. एल. डी. नाईक असे कितीतरी विद्यार्थी आठवणीतून जात नाहीत.

प्राचार्य सोनटक्के यांच्या काळात त्यावेळी जे प्राध्यापक होते त्यापैकी अनेक प्राध्यापक महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणी प्राचार्य या पदावर रुजू झाले. यामध्ये बी. एम. बिराजदार, बापूसाहेब काळबांडे, प्रा. यू. डी. सावंत अशा काही प्राध्यापकांचा समावेश आहे, राज्यशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख प्रा. पद्माकर केंद्रे हे महाराष्ट्र शासनाच्या प्रशासकीय सेवेतील उच्च पदावर कार्यरत होते. यानंतर राज्यशास्त्र विषयाचेच विभाग प्रमुख प्रा. उमाकांत सावंत हे विद्यापीठातील अधिष्ठाता या पदावर कार्यरत होते, याच महाविद्यालयातील हिंदी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. माधव पंडित हे नंतरच्या काळात मुंबई विद्यापीठात हिंदी विभाग प्रमुखपदी विराजमान झाले. इंग्रजी विषयाचे प्रा. भीमराव रगड़े हे गवर्नमेंट पॉलिटेक्निक इंस्टिट्यूटमध्ये कार्यरत झाले, सोनटक्के यांच्या काळात तेलंगणा, उत्तर प्रदेश, केरळ या राज्या तील योग्यता प्राप्त व्यक्तींना ही सेवेची संधी दिली.

प्राचार्य सोनटक्के यांनी तत्कालीन विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना दिलेल्या प्रोत्साहनाची ही एक प्रकारची फलश्रुती होय. शेवटी या ठिकाणी कोणीही एखादी व्यक्ती महत्त्वाची नाही, हे सर्व श्रेय त्या त्या संस्थेला जात असते. जर व्यक्तीच निष्क्रिय असेल तर संस्थाही कोलमडून पडते. व्यक्ती श्रेष्ठ का संस्था श्रेष्ठ ? या प्रश्नाचे उत्तर शेवटी व्यक्तीच आहे. प्राचार्य सोनटक्के यांच्या रूपाने श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालयाला हे व्यक्तिमत्व लाभले. परिणामी हा सुगंध भविष्यामध्ये अनेक वर्ष दरवळत राहील एवढे मात्र निश्चित !प्राचार्य मनोहर सोनटक्के यांना दीर्घायुष्य लाभो एवढीच सदिच्छा.

**-प्रा. ई. आर. मठवाले,**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख, (सेवानिवृत्त)
श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय,
पूर्णा जंक्शन

## चित्त ठेव शांत...

शोधतोस कुठे । तुझ्या ईश्वराला ।
आतल्या मनाला । शुद्ध ठेव ।।
ईश्वराचे स्थान । निर्मळ मनात ।
धर्म आणि जात । भेद नाही ।।
ईश्वर अल्लाह । एकचि समज ।
समतेचा ध्वज । हाती ठेव ।।
मनाने पावन । असणारा देव ।
नित्य ध्यानी ठेव । वेड्या जिवा ।।
कर जोड तिथे । जिथे ज्ञानदान ।
जगती महान । गुरुदेव ।।
सोबत घेऊन । सर्वांना जायचे ।
तुज करायचे । पुण्य कर्म ।।
अनंत यातना । भोगावे लागेल ।
दुष्कर्म असेल । तुझे जर ।।
नको धडपडू । प्रसिद्ध व्हायला ।
कर्म करायला । धडपड ।।
चित्त ठेव शांत । अजु नियमित ।
तुझे आहे हित । सेवेमध्ये ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी
ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरातून जनतेच्या अडीअडचणीचा निपटारा -आ. चिखलीकर

**लोहा (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र शासनाच्या 'लोककल्याणकारी' धोरण आणि महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबीर घेण्यात येत आहे. त्याचा फायदा त्या त्या भागातील नागरिकांना होत आहे. प्रलंबित प्रश्नांचा निपटारा करण्यासाठी अशा शिबिराचा फायदा होतो. गतिमान प्रशासनासाठी हे शिबीर उपयुक्त व महत्वाचे ठरतात, असे प्रतिपादन विधिमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

'तालुक्यातील कापशी बु. येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर विधीमंडळ उपविधान समितीचे अध्यक्ष आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी पार पडले

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या प्रेरणेने सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कंधार दोनुरू अनन्या रेड्डी, तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या पुढाकाराने कापशी (बु.) येथे पार पडले.



महाराजस्व अभियान शिबिराच्या अध्यक्षस्थानी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर होते. त्यांनी या शिबिरातून गतिमान प्रशासन होण्यास मदत होते. लोकांच्या प्रलंबित प्रश्नांची उकल जागीच होते. त्यातून श्रम व वेळ वाचतो. तालुक्यातील अधिकारी यांनी जनतेची कामे तातडीने करावीत. तसेच शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना लवकर मिळावा यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन आ. प्रताराव पाटील चिखलीकर यांनी केले.

तिसरे महाराजस्व शिबीर कापशी बु. (ता. लोहा) येथे पार पडले. यावेळी महसूल, कृषी, आरोग्य, पंचायत समिती, भूमी अभिलेख, जि. प. बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक, पशुधन विकास तसेच शिक्षण विभाग अशा विविध विभागांचे स्टॉल लावण्यात आले होते.

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या आपापल्या विभागातील विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारले. तहसील कार्यालयाच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले. ऑनलाईन सातबारा उतारे व आठ-अ उतारे, फेरफार उतारे नागरिकांना देण्यात आले. अकरा पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यात आला. सात बारा व फेरफार, तसेच सोळा नवीन शिधापत्रिकांचे वाटप, शिधापत्रिका दुरुस्त्या संदर्भात अर्जही स्वीकारण्यात आले. उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र असे एकूण ३० प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.

तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी प्रास्ताविक केले व अभियानाचे स्वरूप सांगितले. उपस्थितांचे आभार मंडळ अधिकारी शिवकांता पवार यांनी केले.

माजी सभापती आनंदराव पाटील, राजू पाटील कापसीकर, माजी कृउबा संचालक केरबा पाटील कापसीकर, उपअभियंता बनसोडे, बांधकाम उपअभियंता शिवाजी राठोड, सा. बां. विभागाचे उपअभियंता नरबीटवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. कांबळे, नायब तहसीलदार राजेश पाठक, निवडणूक नायब तहसीलदार संदीप हाडगे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नागार्जुन खैरे, तसेच सर्व कार्यालयीन कर्मचारी ही उपस्थित होते. कापशी बुच्या मंडळ अधिकारी शिवकांता पवार, ग्राम महसूल अधिकारी स्वाती सुत्रावे, मोतीराम पवार, स्वाती येडे, लाडेकेर, मेहूनकर, गोधने, स्नेहल महानुर तसेच कृषी सहाय्यक, ग्राम सेवक, अभियानास सहकार्य केले.

# किनवट तालुक्यात टरबूज, खरबुजांना वाढली मागणी



**किनवट (प्रतिनिधी)**– उन्हाचा कहर वाढत असताना पोटाला थंडावा देणाऱ्या टरबुजांसह खरबुजांना किनवट,गोकुंद्यासह तालुक्यात मागणी वाढली आहे. सध्या १० ते १५ रुपये प्रतीकिलो मिळणारी वरील फळे येत्या काही दिवसांत महागणार असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

उन्हाळ्याची चाहूल लागताच बाजारात टरबूज,खरबूज दाखल होतात.पूर्वी केवळ नदीकाठीच दिसून येणाऱ्या

या फळांची आता शिवारातही लागवड केली जात आहे. किनवट तालुक्यातील अनेक ठिकाणच्या शिवारात सध्या टरबुजाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात आली आहे.उन्हाचा कहर जसजसा वाढतो,तशी या फळांना मोठी मागणी असते.शिवाय,रमजान महिन्यातही या फळांना चांगलीच मागणी असते.यंदा वातावरणातील बदलामुळे टरबूज,खरबूज जवळपास महिनाभर उशिराने बाजारात दाखल झाले.परिणामी या फळांना चांगला भाव मिळत नाही.कोरोना महामारीच्या काळात १ ते ४ किलोपर्यंतचे टरबूज,खरबूज केवळ १० ते २० रुपयांना विकले गेले होते.यंदा हंगाम लांबला.शिवाय,म्हणावी तशी मागणी नसल्याने आठवडाभरापूर्वी टरबूज १० रुपये प्रतीकिलो अथवा नगाने मिळणाऱ्या टरबूज आजघडीला १५ रु. किलोने मिळत आहेत. तालुक्यातील मारेगाव,कमठाला,गणेशपूर,बेल्लोरी आदी शिवारातील टरबूज,खरबुजाला सध्या चांगली मागणी आहे.बाजारात दाखल झालेली ही फळे नदीकाठची नसली,तरी लालसर व गोड असून,नैसर्गिक पद्धतीने पिकविलेली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

### भाव वाढणार!

आठवडाभरापूर्वी १० रुपये किलो दराने मिळणारे टरबूज, खरबूज आता १५ रु. किलो या दराने विक्री केली जात आहे. सध्या स्थानिकसह महानगरात या फळांना मागणी वाढत असल्याने जवळपास येत्या आठवडाभरात टरबूज, खरबूज २० रुपये प्रतीकिलो होतील, अशी माहिती गणेशपूर येथील विक्रेत्या शेतकऱ्याने दिली आहे.

## महिला शेतकरी गटांना कृषी अवजारे बँक स्थापनेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

**नांदेड (प्रतिनिधी)**– नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २.० पोकरा अंतर्गत गावांमध्ये गावस्तरीय कृषी अवजारे बँक हा घटक राबविण्यात येत आहे. याचा मुख्य उद्देश अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना कृषी अवजारांच्या उच्च किंमतीमुळे उद्‌भवणाऱ्या समस्येवर मात करण्यासाठी व यांत्रिकीकरणाच्या माध्यमातून कृषी ऊर्जेचा वापर वाढविणे हा आहे. या अंतर्गत गावांतील महिला शेतकरी गटांना कृषी यांत्रिकीकरणासाठी आवश्यक कृषी अवजारे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. परंतु आता अर्ज २५ एप्रिल २०२६ ही अंतिम मुदतवाढ दिली आहे.

# 'स्वरगंध'च्या वतीने आज 'गीतों के रंग, सुरों के संग' कार्यक्रम

**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड येथील 'स्वरगंध संगीत मंचा'च्या वतीने रविवार, दिनांक १२ एप्रिल रोजी गीतों के रंग सुरों के संग या मराठी व हिंदी सुप्रसिद्ध चित्रपट गीतांचा अनोखा नजराणा सादर करण्यात येणार आहे. या सुमधुर संगीताचा कार्यक्रम नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण सभागृहामध्ये सायंकाळी ६ वाजता होणार असून, या कार्यक्रमाचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, नांदेड वाघाळा महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे, प्रसिद्ध उद्योजक अनिल शेटकार आणि दैनिक गोदातीर समाचारचे मुख्य संपादक केशव घोणसे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.




या कार्यक्रमात सिनेसृष्टीतील सुप्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपट गाणी गायली जाणार असून, यात साईनाथ लिंगाडे, शिवाजी टाक, संतोष टाक, लक्ष्मीकांत लिंगाडे, राहुल हटकर, सुभाष जोंधळे, संतोष बक्षी, राजेश कानडखेडकर, डॉ. चंद्रशेखर किसवे, ललिता दुलगच, मंदाकिनी गाडेकर, अश्विनी राठोड, वैष्णवी पारवेकर, सुखदा जोशी, दीपाली चौधरी या कलावंतांचा सहभाग राहणार आहे.

तसेच या कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी अंबादास पार्डीकर हे सांभाळत आहेत. या संगीतमय मेजवानीचा आस्वाद नांदेडकरांनी सहकुटुंब सहपरिवार व मित्रमंडळीसह घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाच्या आयोजकांनी एका पत्रकानुसार केले आहे.

# सोनू कल्याणकर यांच्या मारेकऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करा; लिंगायत समाजाची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरातील श्रीनगर परिसरात लिंगायत समाजाचे कार्यकर्ते सोनू कल्याणकर यांचा भरदिवसा सार्वजनिक ठिकाणी झालेल्या निर्घृण हत्येने संपूर्ण नांदेड शहर हदरले आहे. या घटनेच्या निषेधार्थ संतापाची लाट उसळली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, आरोपींवर तत्काळ कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

अलीकडील काही दिवसांपासून नांदेड शहर व जिल्ह्यात गुन्हेगारी घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अवघ्या सुमारे ७० तासांच्या कालावधीत पाच खुनांच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. व्यापारी, विद्यार्थी तसेच



सर्वसामान्य नागरिक असुरक्षिततेच्या छायेत जीवन जगत असल्याचे चित्र आहे.

या पार्श्वभूमीवर श्रीनगर परिसरातील ही हत्या अधिकच धक्कादायक ठरली आहे. सोनू कल्याणकर हे लिंगायत समाजातील सक्रिय, तरुण व लोकप्रिय कार्यकर्ते होते. त्यांनी रक्तदान शिबिरे आयोजित करणे, गरजू नागरिकांना मदत करणे, विद्यार्थ्यांना सहकार्य करणे अशा विविध सामाजिक उपक्रमांतून आपली ओळख निर्माण केली होती. त्यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे समाजात शोककळा पसरली असून, राज्यभरातून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त होत आहे.

दरम्यान, या हत्येमागे संघटित गुन्हेगारीशी संबंधित घटकांचा सहभाग असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे पीडित कुटुंबाच्या सुरक्षेबाबतही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

या घटनेच्या निषेधार्थ प्रा. मनोहर धोंडे, अ‍ॅड. अविनाश भोसीकर, रामदास पाटील सुमठाणकर, संजय बेळगे, शिवा नरंगले, बबन बारसे, गंगाधर बड्डूरे, शंकर महाजन आदी मान्यवरांनी पोलीस अधीक्षक यांना निवेदन सादर केले आहे.

या निवेदनात हत्येतील सर्व आरोपींना तत्काळ अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, प्रकरणाची विशेष दखल घेऊन फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालवावा पीडित कुटुंबास तात्काळ पोलीस संरक्षण द्यावे खटला प्रभावीपणे लढण्यासाठी अनुभवी विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती करावी आदी मागण्या या निवेदनानुसार करण्यात आल्या आहेत.

# गोदावरी मनार पब्लिक स्कूलमध्ये इंग्रजी क्लब स्पर्धा उत्साहात




**शंकरनगर (प्रतिनिधी)**– गोदावरी मनार पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, शंकरनगर येथे इंग्रजी क्लब अंतर्गत आयोजित वक्तृत्व स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या.

इंग्रजी क्लब हे विद्यार्थ्यांना एकत्र येऊन अनौपचारिक वातावरणात इंग्रजी भाषेचा सराव करण्याचे प्रभावी व्यासपीठ आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवणे, संवाद कौशल्य विकसित करणे आणि इंग्रजी भाषेत प्रावीण्य मिळवणे हा मुख्य उद्देश आहे.

इंग्रजी ही आंतरराष्ट्रीय भाषा असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थी जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकेल, या दृष्टीने शाळेत दरवर्षी इंग्रजी क्लब राबविला जातो. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्येही प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

या स्पर्धेचे उद्‌घाटन किनवट प्रकल्प कार्यालयाचे कनिष्ठ शिक्षण अधिकारी के. पी. बोर्डे, जोशी आणि प्राचार्य पांडेय डी. पी. यांच्या हस्ते झाले. वर्षभरात क्लबमध्ये सहभागी झालेल्या सुमारे १२ गटांनी या वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. सर्व गटांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

स्पर्धेत पी. एल. बनसोडे यांच्या गटाने प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांक शेरे पी. टी. यांच्या डेझी गटाला, तर तृतीय क्रमांक मुसांडे एन. आर. यांच्या ब्लूबेल गटाला मिळाला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.

# भोकरमध्ये १४ एप्रिल रोजी डीजेमुक्त वातावरणात भीमजयंती मिरवणूक

**भोकर (प्रतिनिधी)**– भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती भोकर शहरात मोठ्या उत्साहात डिजेमुक्त वातावरणात १४ एप्रिल रोजी साजरी करण्यात येणार आहे. दि. १९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता व्याख्यान व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हयातीत वंचितांच्या घटकासाठी संघर्ष करून माणूसपण मिळवून दिले.स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या मूल्यांवर देशाला संविधान देवून सर्वसामान्य महिलांना न्याय दिला. त्यांची जयंती हर्षोल्हासात साजरी झाली पाहिजे, डॉ. आंबेडकर यांना अभिप्रेत असलेल्या विचारांचे प्रतिबिंब जयंतीच्या माध्यमातून दिसले पाहिजे, डिजेमुळे कर्कश आवाजाचा अनेकांना त्रास होत आहे. हृदयावर परिणाम होत आहे. तरुण वर्गाला दिशा मिळण्यावाठी, डिजेमुक्त वातावरणात बँड ढोल ताशाच्या गजरात भोकर शहरात मंगळवार, दि. १४ एप्रिल २६ रोजीच महामानवाची जयंती साजरी करण्यात येणार आहे.

मंगळवार, दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ८.३० वा. सर्व वार्डातील बुध्द विहारांसमोर पंचशील ध्वजारोहण त्यानंतर ९.३० वाजता डॉ. आंबेडकर पुतळ्याच्या नियोजित जागोत जयंती मंडळाच्या अध्यक्षा सुलोचना ढोले यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण होईल. त्यानंतर त्रिशरण पंचशील बौध्द महासभेचे तानुकाध्यक्ष सुरेश जोंधळे, सचिव उत्तम एडके हे घेणार आहेत.

# विश्व कल्याण नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी प्रा. प्रभाकरराव उदगीरे

## उपाध्यक्षपदी माधवराव पटणे तर सचिवपदी विनोद खाकरे





**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील विश्व कल्याण नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी प्रा. प्रभाकरराव उदगीरे, उपाध्यक्षपदी माधवराव पटणे तर सचिवपदी विनोद खाकरे यांची निवड करण्यात आली आहे.

संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत संचालक म्हणून प्रा. प्रभाकरराव उदगीरे, माधवराव पटणे, माधवराव एकलारे, अ‍ॅड. विरभद्र नांदेडकर, प्रभाकरराव थोन्टे, विनोद खाकरे, श्रीमती रत्नमाला साबळे, सौ. चंदा हळदे आणि दिलीप माचापुरे यांची निवड झाली आहे.

जिल्हा उपनिबंधक यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवडणूक प्रक्रिया पार पडली. त्यानंतर नव्या कार्यकारिणीची निवड जाहीर करण्यात आली.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे संस्थेच्या सदस्यांकडून अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त केला जात आहे. तसेच आगामी काळात संस्थेच्या विकासासाठी नव्या कार्यकारिणीकडून प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बिलोलीत शहर विकास कृती समितीतर्फे पाणपोई




**बिलोली (प्रतिनिधी)**– व्यंकटेश कुंचनवार यांच्या स्मरणार्थ बिलोली शहर विकास कृती समितीच्यावतीने बिलोली शहरात जुन्या बसस्थानक परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत शुक्रवारी पाणपोईचे उद्‌घाटन करण्यात आले.

शहर विकासाचा ध्यास घेऊन गेल्या अनेक वर्षांपासून बिलोली शहर विकास कृती समिती काम करते. त्याच अनुषंगाने कै. व्यंकटेश कुंचनवार यांच्या स्मृती प्रीत्यर्थ दरवर्षी पाणपोईचे स्टॉल लावून तहानलेल्यांची तृष्णा भागविली जाते. यंदाही उष्णतेची तीव्रता पाहून आणि या मार्गावरून जाणाऱ्या पादचाऱ्यांना पिण्यास पाणी मिळावे या हेतूने बिलोली शहर विकास कृती समितीतर्फे शुक्रवारी जुना बसस्थानक परिसरात पाणपोईचे उद्‌घाटन सहायक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहर विकास कृती समितीचे अध्यक्ष गोविंद मुंडकर, माजी नगराध्यक्ष सुभाष पवार, विजयकुमार कुंचनवार, यादवराव तुडमे, नगरसेवक यशवंत गादगे, नगरसेविका मैमुना बेगम अमजद खान, माधवराव जाधव, श्रीमती मीरा संगनोर, विठ्ठलराव रायकंठवार, अभिजीत तुडमे, माजी नगरसेवक अमजद चाऊस, सय्यद रियाज आदी उपस्थित होते.

# मोघाळी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात संपन्न

**भोकर (प्रतिनिधी)**– प्रशासनाला अधिक लोकाभिमुख करण्यासाठी आणि शासकीय योजनांचा लाभ थेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या विशेष अभियानांतर्गत शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ रोजी तालुक्यातील मौजे मोघाळी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' उत्साहात पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून महसूल, आरोग्य आणि पशुसंवर्धन विभागाच्या विविध सेवांचे एकाच छताखाली वाटप करण्यात येऊन जनतेच्या तक्रारींचे तातडीने निवारण करण्यात आले.

या शिबिरात प्रलंबित असलेले दाखले आणि प्रमाणपत्रे ग्रामस्थांना तत्काळ उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न प्रमाणपत्र, १२ रहिवासी प्रमाणपत्र, ०८, ७/१२, होल्डिंग प्रमाणपत्र ३७, आयुष्मान भारत कार्ड १८, नवीन/



दुरुस्त शिधापत्रिका १६, यासोबतच शेतजमीन फेरफार नकलांचेही वाटप करण्यात आले. महसूल विभागाने दाखवलेल्या या तत्परतेमुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तहसीलदार विनोद गुंडमवार यांची उपस्थिती होती. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासन सर्वतोपरी मदत करण्यास तयार आहे, परंतु शेतकऱ्यांनी आपापसातील सलोखा राखून गावाच्या आणि स्वतः च्या विकासासाठी पुढाकार घ्यावा. तसेच बदलत्या काळात 'डिजिटल सेवांचा' वापर करून शासकीय कामे कशी सुलभ करता येतील यावरही त्यांनी सविस्तर प्रकाश टाकला.

आरोग्य विभागाच्या वतीने विशेष स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. पशुवैद्यकीय विभागानेही शेतकऱ्यांच्या पशुधनाबाबत असलेल्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना सुचवल्या. महिला व बालविकास प्रकल्पाच्या वतीनेही विविध योजनांची माहिती देण्यात आली.

या शिबिराच्या अध्यक्षस्थान मोघाळीचे सरपंच सतीश पवार यांची उपस्थिती होती. व्यासपीठावर परिविक्षाधीन तहसीलदार अभयराज नंजुंडे, तालुका आरोग्य अधिकारी संदेश जाधव, पत्रकार बालाजी नारलेवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. होगे, मंडळ अधिकारी सतीश दंतुलवाड, ग्राम महसूल अधिकारी गौराजी कसेवाड, कुलदीप हनवते, माधुरी गिरी, निकिता भोसले, दीपिका गोजे, भाग्यश्री बखळ व एकात्मिक बाल विकास प्रकल्प सुपरवायझर वंदना राव, यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळ अधिकारी सतीश दंतुलवाड यांनी केले, तर सूत्रसंचालन मुंगे यांनी केले. याप्रसंगी मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी, पोलीस पाटील, ग्रामविस्तार अधिकारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, माजी सरपंच, प्रतिष्ठित नागरिक आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारडीच्या सरपंच पदासाठी नामांकनपत्र दाखल



**लोहा (प्रतिनिधी)**– शहरापासून जवळच असलेल्या पारडी येथील पोटनिवडणुकीसाठी गुरुवार, दि. ९ मार्च रोजी नामांकनपत्र दाखल करण्याच्या तिसऱ्या दिवशी सरपंच पदासाठी दोन उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले.

पारडीचे सरपंच पद खुला प्रवर्ग महिलेला सुटले होते.सरपंच पंचफुला दत्ता पवार यांचे अपघाती निधनाने सरपंच पद रिक्त झाले होते. गतवेळी माजी सैनिक उद्धव माणिकराव डिकळे यांच्या पत्नी रूकुबाई उद्धव डिकळे यांचा अल्पशा मताने पराभव झाला होता. लोहा तहसील कार्यालयात निवडणूक विभागात गुरुवार, दि. ९ एप्रिल रोजी रूकुबाई उद्धव डिकळे वय ४० वर्ष, प्रयागबाई माणिकराव डिकळे वय ६२ वर्ष या सासू-सुनेने थेट जनतेतून सरपंच पदासाठी नामांकन पत्र दाखल केले.

नामांकनपत्र दाखल करताना माजी सैनिक उद्धव डिकळे, संभाजी कदम, दशरथ डिकळे, बालाजी डिकळे, सूर्यकांत गायकवाड, तिरूमला डिकळे, बाळू पवार, मल्लिकार्जुन मटके, विठ्ठल डिकळे, माधव पवार, रामेश्वर लिंबोटकर, गोविंद मोरे, बालाजी मटके, संग्राम डिकळे, विश्वांभर पवार, प्रल्हाद डिकळे, विश्वनाथ डिकळे, शंकर पवार,राजीव गायकवाड, विश्वनाथ वाघमारे, सुनील गायकवाड, ओम पवार काळेश्वर डिकळे, शरद डिकळे, ज्ञानेश्वर डिकळे, देवानंद डिकळे आदींची उपस्थिती होती.

# चंदेरी

**अभिनेते बृजेंद्र काला यांनी आपल्या साधेपणाने आणि सामान्यांना भावणारी पात्रे साकारून सर्वांची मने जिंकली आहेत. रंगभूमीवरून सुरू झालेला त्यांचा अभिनय प्रवास केवळ छोट्या किंवा मोठ्या पडद्यापुरता मर्यादित नव्हता; त्याचा करिष्मा ओटीटी प्लॅटफॉर्मवरही दिसून आला आहे. ते सध्या त्याच्या 'किस्सा कोर्ट कचेरी' या कोर्ट ड्रामा चित्रपटामुळे चर्चेत आहेत. हा चित्रपट अलीकडेच १३ मार्चला चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. त्यांची खास मुलाखत...**

## कधी पोलीस स्टेशन, कोर्टाच्या जाळ्यात अडकू नये... एकवेळ हॉस्पिटल परवडले!

### चित्रपटांत वकिलाची भूमिका साकारणाऱ्या बृजेंद्र काला यांचे स्पष्ट मत

**प्रश्न : जेव्हा तुम्ही एखादी भूमिका साकारता, तेव्हा ती एका सामान्य माणसाचे प्रतिबिंब असते. एका सामान्य व्यक्तीची भूमिका साकारण्यासाठी तुम्हाला कशी प्रेरणा मिळते?**

**बृजेंद्र काला :** खरं तर, ते माझ्या स्वभावात, माझ्या व्यक्तिमत्त्वात आहे. त्यात काहीही कृत्रिम नाही, कारण मी जसा आहे तसाच आहे. लोक माझ्या बोलण्याच्या पद्धतीशी आणि माझ्या अभिनयाशी एकरूप होतात. माझ्या बोलण्याच्या पद्धतीवरून त्यांना तीच व्यक्ती वाटते, जी त्यांच्या अवती भवती असते.

**प्रश्न : तुम्ही तुमच्या मोकळ्या वेळेत काय करतात?**

**बृजेंद्र काला :** मी फारसा आराम करत नाही. माझ्या हातात असतं तर, मी स्वतःला नेहमीच व्यस्त ठेवलं असतं. काम करत असताना शक्यतो थकवा जाणवत नाही. तो थकवा नैसर्गिक असतो. जेव्हा तुम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत शॉटची वाट पाहता, तेव्हा तुम्ही थकता. पण जेव्हा तुम्ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करता तेव्हा तुम्हाला जाणवणारा थकवा हा नुसतं बसून असताना जाणवणाऱ्या थकव्यापेक्षा कमी असतो. जेव्हा कधी मला मोकळा वेळ मिळतो, तेव्हा मी थोडं संगीत ऐकण्याचा, घरातील काही कामं उरकण्याचा किंवा एखादी नवीन गोष्ट शिकण्याचा प्रयत्न करतो. माझी सर्वात मोठी समस्या ही आहे की मला पुरेशी झोप मिळत नाही. मला त्याची खूप काळजी वाटते.

**प्रश्न : मोठ्या शहरांमध्ये रंगभूमीसाठी उत्कृष्ट संधी उपलब्ध असतात, पण लहान शहरांमध्ये ते अजूनही एक मोठे आव्हान आहे. मथुरेत नाट्यक्षेत्रात काम केल्यानंतर तुम्ही इथपर्यंत पोहोचलात. तुमचा अनुभव कसा राहिला आहे?**

**बृजेंद्र काला :** अनेक कलाकार नाट्यक्षेत्रातूनच मनोरंजन उद्योगात आले आहेत. दिल्लीत हिंदी रंगभूमी आहे, तर मुंबईत हिंदी, इंग्रजी, मराठी आणि गुजराती अशा अनेक भाषांमध्ये रंगभूमी आहे. मला वाटतं, लहान शहरांमधील लोकांची रंगभूमीतील आवड ही मुख्यत्वे साहित्यिक असते. जिथे रंगभूमी असते, तिथे ते प्रेमचंद आणि अनेक जुनी नाटकं पाहतात. लोकांमध्ये उत्कटता असते आणि ते काहीतरी नवीन करून पाहतात. मग हळूहळू, ते काहीतरी मोठं करण्याचा प्रयत्न करतात, ज्यासाठी मोठ्या भूमिकेची गरज असते, जे लहान शहरांमध्ये मिळणं अवघड असतं. आम्ही खूप कठीण काळ पाहिला आहे.





**प्रश्न : त्या कठीण काळात तुमचा सोबती कोण होता?**

**बृजेंद्र काला :** सुरुवातीला, जेव्हा आम्ही थिएटरमध्ये जायचो. एक कप चहा, एक सामोसा घ्यायचो आणि सराव करायचो, वाचन करायचो किंवा रंगमंचावरील हालचालींची जुळवाजुळव करायचो. संपूर्ण महिना निघून जायचा. सुट्टीचा दिवस न घेता. कधीकधी ६, ७ किंवा ८ वाजेपर्यंत सराव करत असू. आम्ही खूप गांभीर्याने काम करायचो; ते एक वेगळेच जग होते, कारण कामाची पद्धत सिनेमासारखी नसते. आम्ही त्यातून खूप काही शिकलो आहोत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आम्हाला शिस्त आणि एकाग्रता मिळाली आहे.

**प्रश्न : आज अनेक नाट्य कलाकार स्टार आहेत. तुमची कोणाशी घनिष्ठ मैत्री होती का?**

**बृजेंद्र काला :** एक काळ असा होता, जेव्हा कोणाकडे काम नसायचं, तेव्हा मैत्री जुळून यायची. इरफान, तिग्मांशु आणि मी, आम्ही सगळे मित्र होतो. आम्ही आमच्या मोकळ्या वेळेत क्रिकेट खेळायचो, रात्री एकत्र बसून संगीत ऐकायचो आणि सगळ्यांची कुटुंबं एकत्र असायची. आम्ही आमच्या भविष्याबद्दल विचार करायचो आणि त्यावर चिंतन करायचो. तो मैत्रीचा काळ होता. पण असं नाही की आज आमचे कोणी मित्र नाहीत. गरज असेल तेव्हा कोणीतरी नेहमी मदतीला येतं.

**प्रश्न : तुम्ही दिल्लीच्या नाट्यक्षेत्रात बराच काळ घालवला आहे. दिल्लीच्या तुमच्या कोणत्या आठवणी आहेत?**

**बृजेंद्र काला :** मी माझ्या नाट्य कारकिर्दीची सुरुवात दिल्लीत केली. तेव्हा आम्ही नाटकं करण्यासाठी मथुरेहून दिल्लीला प्रवास करायचो. ती एक मोठी गोष्ट होती. आम्ही मंडी हाऊसला जायचो. दिल्लीची गोष्टच वेगळी आहे.

**प्रश्न : तुमच्या वैयक्तिक आयुष्यात तुम्हाला कधी कोर्ट केसेसचा सामना करावा लागला आहे का?**

**बृजेंद्र काला :** (हसत) नाही, नाही, मला अजूनपर्यंत अशा परिस्थितीचा सामना करावा लागलेला नाही. मी देवाकडे प्रार्थना करतो की कोणीही कधी पोलीस स्टेशन आणि कोर्टाच्या जाळ्यात अडकू नये. यापेक्षा तर ते हॉस्पिटलमध्ये गेले तरी चालेल. तिथे त्यांच्यावर कसेतरी उपचार होतील, पण या दोन ठिकाणी तुम्हाला तोडगा मिळेलच याची काही खात्री नाही.

**प्रश्न : तुमच्या 'किस्सा कोर्ट कचेरी का' या चित्रपटात तुम्ही पुन्हा एकदा वकिलाची भूमिका साकारत आहात. पुन्हा एकदा वकिलाची भूमिका साकारण्याचा अनुभव कसा होता?**

**बृजेंद्र काला :** मी अनेकदा वकिलाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटात माझ्या भूमिकेत काही नकारात्मक छटा आहेत. याच गोष्टीने मला हा चित्रपट करण्यास प्रेरणा दिली. जेव्हा तुम्ही खूप देखण्या आणि आकर्षक भूमिका साकारायला लागता, तेव्हा तुम्हाला आपोआपच आश्चर्य वाटू लागतं की लोक इतके देखणे का असतात. म्हणून, मी काही बदल केले. ही कथा मेरठमधील एका हिट-अँड-रन प्रकरणावर आधारित आहे आणि गुन्हेगार एका श्रीमंत माणसाचा मुलगा आहे. मी त्या मुलाला वाचवण्यासाठी लढत आहे. कथा कदाचित कंटाळवाणी वाटेल, पण आम्ही ती खूप सुंदरपणे सादर केली आहे. ही एका सत्य घटनेवर आधारित आहे, ज्यावर न्यायालयात वादविवाद झाला आहे. मी ती रंजक बनवण्याचा प्रयत्न केला आहे.

---

**कलाकारांना इन्फ्लुएन्सर्सचा राग येणे स्वाभाविक**

## माझ्यात दिल्लीचा तोरा नाही, मी मान खाली घालून चालते...

**अभिनेत्री कुशा कपिलाची विशेष मुलाखत**



**साऊथ दिल्लीच्या आंटींची नक्कल करून सोशल मीडिया स्टार बनलेली इन्फ्लुएन्सर कुशा कपिला आता अभिनयाच्या दुनियेत रमली आहे. थँक यू फॉर कमिंग आणि सुखी यांसारख्या चित्रपटांमध्ये दिसलेली कुशा सध्या 'मामला लीगल है २' या वेब सीरिजमुळे चर्चेत आहे. विशेष म्हणजे, मुंबईत स्थायिक झालेली कुशा या सीरिजमध्ये दिल्लीच्या पटपडगंज कोर्टात वकिली करताना दिसणार आहे.**

### दिल्लीचा अहंकार सोडून मुंबईला केले आपलेसे...

दिल्ली ते मुंबईच्या प्रवासात या दोन शहरांनी कुशाच्या व्यक्तिमत्त्वाला कसा आकार दिला? तिला दिल्लीची कोणती गोष्ट आठवते आणि मुंबईत तिला काय आकर्षक वाटते? असे विचारल्यावर ती म्हणते, की दोन्ही शहरांची स्वतःची अशी खास वैशिष्ट्ये आहेत, पण मनाने मी दिल्लीची आहे. दिल्लीत असताना मला नाटकं पाहण्याची आणि रंगभूमीवर काम करण्याची आवड निर्माण झाली. मुंबईत मला दिल्लीच्या जेवणाची खूप आठवण येते, कारण तुम्ही कितीही शोधले तरी ती उत्तर भारतीय चव इथे मिळत नाही. माझी परिस्थिती अशी झाली आहे की, तुम्ही मला दिल्ली पद्धतीचे जेवण दाखवले तर मी तुमच्या मागे येईन. तरीही, मी मुंबईच्या जेवणाचाही बऱ्यापैकी स्वीकार केला आहे. मी भाकरी आणि इतर पदार्थही खाऊन पाहते. मी जे काही खाते त्यात कढीपत्ता असतो, त्यामुळे मी या शहराला पूर्णपणे आपलेसे करत आहे. माझ्यात दिल्लीचा तोरा अजिबात नाही. मी मान खाली घालून चालते. माझ्या कामाशी काम ठेवते आणि आयुष्याला फार गांभीर्याने घेत नाही. मी मुंबईत एक सुंदर धडा शिकलेः कोणतीही गोष्ट फार गांभीर्याने घेऊ नये. दुसरे म्हणजे, मी दिल्लीतील पीतमपुराची आहे. त्यामुळे मुंबईत असलेली सांस्कृतिक विविधता तिथे नव्हती. मी माझ्यासारख्याच लोकांमध्ये वाढले. मी ज्या शाळेत गेले, तिथे प्रत्येकाचे आडनाव सारखेच होते. ही विविधता मी पहिल्यांदा कॉलेजमध्ये पाहिली, जेव्हा मी वेगवेगळ्या राज्यांतील लोकांना भेटले. त्यामुळे, मला मुंबईबद्दल जी गोष्ट खरोखर आवडते ती म्हणजे इथली सांस्कृतिक विविधता. हे शहर वेगवेगळ्या संस्कृतींचे एक सुंदर मिश्रण आहे.



### आयुष्य जसे जगली, तसेच जगायचे आहे...

सोशल मीडिया स्टार्सचे आयुष्य अनेकदा एक खुले पुस्तक असते. ज्यामुळे त्यांच्यावर टीका होऊ शकते आणि त्यांना ट्रोल केले जाऊ शकते. कुशाला तिच्या घटस्फोट आणि व्यवसायाबद्दलच्या पोस्टमुळे ट्रोलही करण्यात आले आहे. ती या गोष्टी कशा घेते? यावर ती म्हणते, की खरं तर, आपलं वैयक्तिक आयुष्य किती खासगी ठेवावं, हे काम करता करताच कळतं. लोक अनेकदा विसरतात की क्रिएटर्स त्यांच्यामधूनच येतात. आम्ही कोणत्याही विशिष्ट पार्श्वभूमीतून आलेलो नसतो. आम्हाला वाटायचं की आम्ही कॅमेऱ्यासमोर काहीतरी करू शकतो, स्वतःला एडिट करू शकतो, वेगवेगळ्या भूमिका साकारू शकतो, त्यामुळे आम्ही सुरुवातीच्या उत्साहात वाहून जातो आणि मी त्याला चूक म्हणणार नाही. तुम्ही कोणत्याही कलाकाराकडे बघा, ते त्यांच्या सुरुवातीच्या काळात निर्भय असतात. मग हळूहळू ते स्वतःभोवती अडथळे उभे करू लागतात. जेव्हा तुम्हाला इंडस्ट्री आणि तुमचा व्यवसाय समजू लागतो, तेव्हा तुम्ही सावधगिरीने बोलू लागता. पण खरं सांगायचं तर, मी माझं आयुष्य जगायला आवडेल, तसेच जगले आहे. तसंच मी त्याच चुका पुन्हा करायला तयार आहे. मला आनंदाने तोच प्रवास पुन्हा सुरू करायला आवडेल. आज मला माहीत आहे की मला काय बोलायचं आहे आणि काय नाही, पण सुरुवातीला मला माहीत नव्हतं. ट्रोलिंग-वोलिंग सुरूच राहणार; आपण त्याबद्दल काय करू शकतो?

### आम्ही क्रिएटर्सची पहिली पिढी...



आजकाल चित्रपटसृष्टीत प्रतिभेऐवजी सोशल मीडियावरील फॉलोअर्सच्या आधारावर कलाकारांची निवड करण्यावरून चर्चा सुरू आहे. अनेक कलाकारांनी यावर आधीच आपला आक्षेप व्यक्त केला आहे. कुशा या मुद्द्यावर कलाकारांना पाठिंबा देत म्हणते, की क्रिएटर्स किंवा इन्फ्लुएन्सर्सना केवळ मार्केटिंगसाठीच कामावर ठेवले जाते, याबद्दल कलाकारांचा जो राग आहे तो पूर्णपणे रास्त आहे. मी या बाबतीत कलाकारांच्या पाठीशी उभी आहे, पण हेही शक्य आहे की काही क्रिएटर्सना अभिनयात यायचे असेल. त्यांना त्यांच्या पाच-पंधरा सेकंदांच्या रील्सपेक्षा अधिक काहीतरी तयार करायचे आहे. तुम्ही पाहिले तर, आम्ही अगदी सुरुवातीच्या क्रिएटर्सपैकी आहोत. आम्ही क्रिएटर्सची पहिली पिढी आहोत, त्यामुळे पुढे काय करायचे याबद्दल आम्हीसुद्धा अनिश्चिततेच्या टप्प्यावर आहोत. आमच्यापैकी काहींना कलाकार बनण्याची अगदी स्वाभाविक महत्त्वाकांक्षा असली तरी, तुम्ही एक पाऊल मागे घेऊन तुम्हाला कोणत्या प्रकारच्या भूमिका आणि प्रोजेक्ट्स करायला आवडतील याचा विचार करायला हवा. जाऊन एक-दोन वर्षे शिका. वर्कशॉप्स करा, ऑडिशन द्या. अपयशी व्हा. मी तीन वर्षांपासून मुंबईत आहे आणि शांतपणे शिकत आहे. मी ती प्रक्रिया सुरू केली आहे आणि याला वीस ते पंचवीस वर्षे लागतील...


---

## सिमरन बग्गाची विशेष मुलाखत : एखाद्या गोष्टीबद्दल वाईट वाटले तर माझ्या पद्धतीने हाताळते, गोंधळ घातला तर दुखावले जाण्याची भीती!

**रजनीकांत, कमल हसन आणि नागार्जुन यांसारख्या अनेक सुपरस्टार्ससोबत काम केलेली दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील एक सुप्रसिद्ध अभिनेत्री सिमरन बग्गा हिने तिच्या करिअरची सुरुवात 'तेरे मेरे सपने' आणि 'सनम हरजाई' यांसारख्या बॉलिवूड चित्रपटांमधून केली. अलीकडेच, तिने 'गुलमोहर' आणि 'रॉकेट्री : द नम्बी इफेक्ट' यांसारख्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांमध्ये आणि ऑस्करसाठी अधिकृत प्रवेशिका असलेल्या 'टुरिस्ट फॅमिली'मध्ये महत्त्वाची भूमिका साकारली आहे. सिमरन लवकरच सनी देओलच्या 'गबरू'मध्ये दिसणार आहे. चित्रपटसृष्टीत तीस वर्षे घालवलेल्या सिमरन बग्गा यांनी दिलेल्या विशेष मुलाखतीत अनेक विषयांवर मनमोकळेपणाने मत मांडले...**

बॉलिवूडमधून आपल्या करिअरची सुरुवात करणाऱ्या सिमरनने प्रत्येक दाक्षिणात्य भाषेत काम केले आहे. ती म्हणते, की मी माझ्या करिअरची सुरुवात 'तेरे मेरे सपने' या चित्रपटातून केली. या चित्रपटातील 'ओ लडकी आँख मारे' हे गाणे खूप प्रसिद्ध झाले. त्याआधी, मी सावन कुमार टाक यांच्या 'सनम हरजाई' या चित्रपटातून पदार्पण केले होते. पण त्या चित्रपटानंतर मी दाक्षिणात्य भारताकडे वळले आणि तिथेच स्थायिक झाले. आता माझा आगामी चित्रपट 'गबरू' आहे आणि मी त्याबद्दल खूप उत्सुक आहे, कारण त्यात मी सनी देओलसोबत काम करत आहे.

काही काळापूर्वी, दक्षिणेकडील हेमा समितीने मल्याळम चित्रपटसृष्टीत लैंगिक छळ, शोषण, मानधन आणि सेटवरील महिलांशी संबंधित मूलभूत सुविधा यांसारख्या मुद्द्यांवरून मोठा वाद निर्माण केला होता.



तुम्हाला कधी सेटवर अशा समस्यांचा सामना करावा लागला आहे का? असे विचारले असता सिमरन म्हणतात, की मला वाटतं की प्रत्येकाचा स्वतःचा दृष्टिकोन असतो. काही लोक संवेदनशील असतात आणि त्यांना गोष्टींबद्दल वाईट वाटतं, म्हणून ते आवाज उठवतात. हो, समस्यांना सामोरे जाण्याची प्रत्येकाची पद्धत वेगळी असते. मला अनुभव आहेत, पण मी ते माझ्या पद्धतीने हाताळते. मी खूप स्पष्टवक्ती आहे; मी थेट त्या व्यक्तीकडे जाते आणि त्यांना विचारते की असं का घडलं. असं घडायला नको होतं. मी त्यांना समजावून सांगते. मूळ कारणापर्यंत पोहोचणं कठीण असतं. जर तुम्ही जास्त गोंधळ घातलात, तर तुम्ही स्वतःलाच त्रास करून घ्याल आणि समोरची व्यक्ती आणखी अस्वस्थ होईल.

### राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांचा भाग...

सिमरन सांगतात, की मी बॉलिवूडमध्ये खूप काम केले आहे. पण दाक्षिणात्य चित्रपट केल्यानंतर माझे लग्न झाले आणि मग कुटुंबात संतुलन साधणे आवश्यक होते. ओटीटीवर मी 'जिद्दी गर्ल' आणि 'सिटाडेल' सारखे प्रोजेक्ट्स केले आणि 'गुलमोहर' सारखा राष्ट्रीय पुरस्कार विजेता चित्रपट केला. या चित्रपटात मी मनोज बाजपेयी यांच्यासोबत काम केले. माझ्या कारकिर्दीतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'रॉकेट्री - द नम्बी' हा चित्रपट, जो पद्मभूषण पुरस्कार विजेते रॉकेट शास्त्रज्ञ नम्बी नारायणन यांच्या जीवनावर आधारित आहे. आर. माधवन दिग्दर्शित आणि अभिनित या चित्रपटात मी मीना नम्बी नारायणन यांची भूमिका साकारली. या चित्रपटांनी हिंदी मनोरंजन उद्योगात माझी ओळख पक्की केली. 'टुरिस्ट फॅमिली'चेही माझ्या मनात एक विशेष स्थान आहे. या चित्रपटाचा ऑस्करच्या स्पर्धकांच्या यादीत समावेश होता आणि तो बॉक्स ऑफिसवर प्रचंड यशस्वी ठरला होता. माझ्या वयाच्या आणि कारकिर्दीच्या या टप्प्यावर, ओटीटी प्लॅटफॉर्मच्या आगमनामुळे अभिनेत्रींसाठी भूमिका लिहिल्या जात आहेत याचा मला खूप आनंद आहे.

### मी रजनी सरांची खूप मोठी चाहती...

तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम यांसारख्या सर्व दक्षिण भारतीय भाषांमधील चित्रपटांमध्ये काम केलेल्या सिमरन दक्षिण भारतीय सुपरस्टार्ससोबत काम करण्याच्या तिच्या अनुभवाबद्दल म्हणते, की अनेक स्टार्ससोबत काम केले आहे, पण रजनी सर, कमल सर आणि नागार्जुन सर यांसारख्या लिविंग लेजेंड्ससोबत काम करून मला खूप काही शिकायला मिळालं. मी रजनी सरांची खूप मोठी चाहती आहे. ते खरे सुपरहिरो आहेत. हे स्पायडर-मॅन आणि सुपरमॅन चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीपासून ते सुपरहिरोच्या भूमिका साकारत आहेत. मला त्यांच्यासोबतच्या शूटिंगचा माझा पहिला दिवस आठवतो. सहसा, जेव्हा आमचं सीन नसतं, तेव्हा आम्ही मेकअप रूममध्ये किंवा व्हॅनिटीमध्ये जाऊन बसतो, पण त्यांच्यासोबत शूटिंग करताना मी एका कोपऱ्यात बसून त्यांना न्याहाळत असे. ते इतके नम्र आणि दयाळू कसे आहेत? मी सेटवर त्याचा खूप अभ्यास केला.

# महिलांना लोकसभेत आणि विधानसभेत आरक्षण देण्याचा निर्णय हेच महात्मा फुले यांना खरे अभिवादन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (प्रतिनिधी)** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला असून तो महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्त्री-शिक्षण व महिला सक्षमीकरणाच्या विचारांना अनुरूप असून त्यांना खरी आदरांजली असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त त्यांचे मूळगाव खानवडी (ता. पुरंदर) येथे पुणे जिल्हा परिषदेकडून उभारण्यात आलेल्या 'ज्योती-सावित्री जिल्हा परिषद शाळेचे' उद्घाटन त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कृषि मंत्री दत्तात्रय भरणे,



अल्पसंख्याक मंत्री अतुल सावे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, शिक्षण राज्यमंत्री योगेश कदम आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पैतृक गावात उभारलेली ही अत्याधुनिक शाळा म्हणजे द्विशताब्दी वर्षाची सर्वात योग्य सुरुवात आहे. सीबीएसई पॅटर्नवरील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतची ही राज्यातील पहिली जिल्हा परिषद शाळा असून ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून देण्यास हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्तरावर झेप घेण्याची क्षमता निर्माण होत असून काही विद्यार्थिनी इस्रो आणि नासासारख्या संस्थांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकारातून या शाळेची उभारणी झाली असून त्यांनी शाळा उभारणीच्या प्रत्येक टप्प्यावर लक्ष घातल्याचेही मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी फ्रेंच व जर्मनसारख्या परकीय भाषा आत्मसात केल्या आहेत, हे बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे द्योतक असल्याचे श्री. फडणवीस म्हणाले.

पुणे जिल्हा परिषदेकडून 'इंडस्ट्री ४.०' अंतर्गत १०० शाळांमध्ये १०० अद्ययावत प्रयोगशाळा उभारण्यात आल्या असून शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महात्मा फुले यांच्या नावाने कौशल्य प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून भविष्यात अशी एक हजार केंद्रे उभारण्यात येतील असे श्री. फडणवीस यांनी सांगितले.

# सुनेत्रा पवारांच्या जीवाला धोका? राजकीय वर्तुळात खळबळ

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवाला रूपाली चाकणकर यांच्याकडून धोका असल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. बीडमध्ये एका व्यक्तीनं खरात प्रकरणाशी संबंधित एक तक्रार दाखल केली असून या तक्रारीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या जीवाला रुपाली चाकणकरांकडून धोका असल्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

दरम्यान सुनेत्रा पवार यांच्या सुरक्षेची पोलीस प्रशासन पूर्ण काळजी घेईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी दिली आहे. भोंदू अशोक खरात प्रकरणात रुपाली चाकणकर



वादाच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. अशोक खरातच्या ट्रस्टमध्ये चाकणकरांचा असलेला सहभाग आणि त्यानंतर त्यांना द्यावा लागलेला राजीनामा, या पार्श्वभूमीवर आता 'एसआयटी' या नवीन तक्रारीची पडताळणी कशी करते आणि या तक्रारीत काही तथ्य आहे की यामागे राजकीय षडयंत्र आहे हे चौकशीनंतरच स्पष्ट होईल.

## वैभव सूर्यवंशीच्या कोचवर होणार कारवाई?

**मुंबई (प्रतिनिधी)** – आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यात काल सामना खेळवला गेला होता. या सामन्यात वैभव सूर्यवंशीने अफलातून कामगिरी करत राजस्थानला मॅच जिंकून दिली. तब्बल ३०० च्या स्ट्राईक रेटने वैभवने खेळी केली. वैभवने २६ बॉलमध्ये ७८ धावांची खेळी केली. याच त्याने ७ सिक्स अन् ८ फोर देखील मारले. यानंतर त्याने आपले वडील आणि कोच रोमी भिंदर यांना विजयाचं श्रेय दिलं. मात्र, वैभवचे कोच आता वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत.

सध्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ व्हायरल होतोय, यात राजस्थान आणि आरसीबीच्या मॅचची ११ वी ओव्हर सुरू असते. तोपर्यंत वैभव आपलं काम करून डगआऊटमध्ये जाऊन बसला होता. जोपर्यंत वैभव डगआऊटमध्ये पोहोचला तेव्हा कॅमेरे त्याच्यावर फोकस झाले.

# परिणामकारक महसूल सेवेसाठी राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवर बंधने

**मुंबई (प्रतिनिधी)** – महसूल विभागातील राजपत्रित अधिकारी वारंवार आणि दीर्घकाळ इतर विभाग किंवा महामंडळांमध्ये प्रतिनियुक्तीवर जात असल्याने मूळ विभागातील कामकाजावर परिणाम होतो. यापुढे महसूल विभागातील अधिकाऱ्याला एकदा प्रतिनियुक्ती पूर्ण केल्यानंतर पुन्हा प्रतिनियुक्तीवर जाण्यापूर्वी मूळ विभागात किमान ३ वर्षे सेवा देणे बंधनकारक असणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला आहे.

प्रशासकीय शिस्त आणि जनतेची सोय : महसूल, नोंदणी महानिरीक्षक, मुद्रांक आणि भूमी अभिलेख यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या उपविभागांतील अधिकारी मोठ्या प्रमाणात प्रतिनियुक्तीवर जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. वरिष्ठ स्तरावरील पदे रिक्त राहिल्याने सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांवर त्याचा थेट परिणाम होतो आणि प्रशासकीय कामकाज विस्कळीत होते. ही परिस्थिती सुधारण्यासाठी महसूल विभागाने नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.

१. अधिकाऱ्यांना सुरुवातीला जास्तीत जास्त ३ वर्षांसाठीच प्रतिनियुक्तीवर जाता येईल. २. प्रतिनियुक्ती संपल्यानंतर संबंधित अधिकाऱ्याने मूळ विभागात किमान ३ वर्षे काम करणे आवश्यक आहे. या कालावधीशिवाय त्यांच्या पुढील प्रतिनियुक्तीचा विचार केला जाणार नाही. ३. हे नियम अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार आणि भूमी अभिलेख विभागातील सर्व राजपत्रित अधिकाऱ्यांना लागू असतील. ४. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा मंत्र्यांच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षे असेल. त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मुख्यमंत्र्यांची विशेष मान्यता आवश्यक राहील. ५. अपवादात्मक परिस्थितीत मूळ विभागाच्या मान्यतेने केवळ १ वर्षाची मुदतवाढ मिळू शकेल.

# महावीरचक्र विजेते कर्नल सोनम वांगचुक यांचे निधन

**लडाख (वृत्तसंस्था)** – लडाखच्या मातीत जन्मलेले आणि संपूर्ण देशासाठी अभिमान ठरलेले कर्नल (निवृत्त) सोनम वांगचुक आता आपल्यात नाहीत. लायन ऑफ लडाख म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शूर अधिकाऱ्यांनी आपल्या पराक्रमाने कारगिल युद्धात इतिहास रचला होता. त्यांच्या निधनाने केवळ लडाखच नव्हे, तर संपूर्ण देश शोकाकुल झाला आहे. लेहमध्ये त्यांना अचानक हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्यांचे निधन झाले. काही दिवसांपासून त्यांना छातीत दुखणे आणि अस्वस्थता जाणवत होती. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, अलीकडेच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते, आणि त्या संदर्भातील विधींसाठी ते लडाखमध्ये आले होते. या काळात सतत लोकांची ये-जा आणि मानसिक ताण यामुळे त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

१९९९ मधील कारगिल युद्ध दरम्यान कर्नल वांगचुक यांनी दाखवलेले धैर्य आजही प्रेरणादायी मानले जाते. ३० मे १९९९ रोजी



त्यांनी अवघ्या ४० सैनिकांसह अत्यंत कठीण परिस्थितीत एक धाडसी मोहिम पार पाडली. सुमारे १८,००० फुट उंचीवर, प्रचंड थंडी आणि बर्फवृष्टीच्या वातावरणात त्यांनी मोठ्या संख्येने पाकिस्तानी घुसखोरांना पराभूत केले.

विशेष म्हणजे या संपूर्ण कारवाईत त्यांना तोफखान्याची कोणतीही मदत नव्हती. तरीही तीन दिवस चाललेल्या या मोहिमेत त्यांनी आपल्या नेतृत्वगुणांनी आणि रणनितीने विजय मिळवला. ही लढाई भारताच्या सुरुवातीच्या निर्णायक विजयांपैकी एक ठरली आणि त्यानंतर भारतीय सैन्याने अनेक महत्त्वाच्या यशस्वी मोहिमा पार पाडल्या.

कर्नल वांगचुक यांच्या या अद्वितीय शौर्यासाठी त्यांना भारताचा दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च युद्धसन्मान महावीर चक्र प्रदान करण्यात आला. त्यांच्या धाडसाने आणि नेतृत्वाने अनेक जवानांना प्रेरणा दिली आणि त्यांची ओळख एक कर्तव्यदक्ष आणि निर्भय अधिकारी म्हणून निर्माण झाली.

११ मे १९६४ रोजी जन्मलेले कर्नल वांगचुक लडाखमधील लेह जिल्ह्यातील संकर गावचे रहिवासी होते. त्यांनी जवळपास ३० वर्षे भारतीय सैन्यात सेवा बजावली आणि २०१८ साली निवृत्त झाले. आपल्या सेवाकाळात त्यांनी अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आणि देशाच्या सुरक्षेसाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनानंतर देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या शौर्य, नेतृत्व आणि देशसेवेप्रती असलेल्या निष्ठेचे कौतुक केले. त्यांनी म्हटले की, वांगचुक हे लडाखच्या जिद्दीचे आणि भारताच्या विविधतेतील एकता या मूल्याचे जिवंत प्रतीक होते.

# १७ व १८ एप्रिलला अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरणाबाबत सुनावणी

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण करण्याच्या अनुषंगाने १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी गठीत समितीसमोर आपली मत मांडण्यासाठी संबंधित व्यक्तींनी १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज सादर करावेत, असे आवाहन सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे.

अनुसूचित जातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण संदर्भात न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर (नि. न्यायाधीश, उच्च न्यायालय, पाटणा) यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने आपल्या शिफारशींसह अहवाल १६ मार्च २०२६ रोजी शासनास सादर केला आहे. या अहवालाच्या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या गठित समितीसमोर १७ व १८ एप्रिल २०२६ रोजी आपली मत मांडता येणार आहे. त्यासाठी संबंधितांनी वस-ुलरींळ.ळप या ई-मेल आयडीवर १५ एप्रिल २०२६ पर्यंत आपले निवेदन किंवा अर्ज पाठवावेत. अर्जासोबत अर्जदाराने आपला दूरध्वनी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे. सुनावणीचे ठिकाण, वेळ व इतर तपशील संबंधितांना दूरध्वनीद्वारे कळविण्यात येणार असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## मुंबईकरांना रविवारी मेगाब्लॉकचा फटका

**मुंबई (प्रतिनिधी)** – लोकल प्रवाशांना रविवारी पुन्हा एकदा मेगाब्लॉकचा सामना करावा लागणार आहे. मध्य रेल्वेकडून विविध अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी १२ एप्रिल रोजी उपनगरी मार्गांवर जम्बो मेगाब्लॉक जाहीर करण्यात आला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.४८ ते दुपारी ३.४५ वाजेपर्यंत मेगाब्लॉक राहणार आहे.

# आईनेच केला मुलाचा घात; विविध घटनांनी मराठवाडा सुन्न

**मुंबई (प्रतिनिधी)** – आई आणि लेकराचं नातं हे जगातील सर्वात पवित्र आणि सुंदर नातं असतं. हे नातं जगातील सर्वाक्ष निस्वार्थ नातं असतं पण गेल्या २४ तासात महाराष्ट्रातील हिंगोली, पुणे आणि शिरूर या तीन वेगवेगळ्या ठिकाणांहून समोर आलेल्या घटनांनी या नात्याला काळिमा फासला आहे. आईच्या हातून असं कसं होऊ शकतं? हा प्रश्न आज प्रत्येकाला अस्वस्थ करत आहे. स्वतःच्या क्षणिक सुखासाठी आणि अनैतिक संबंधांच्या आड येणाऱ्या पोटच्या गोळ्यांचा काटा काढताना या मातांचे हात थरथरले नाहीत, अशी भावना प्रत्येकाकडून व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्रात घडलेल्या या तीन घटनांना महाराष्ट्र सुन्न झालाआहे.

हिंगोलीच्या सेनगावमध्ये सचिन राजगुरू या तरुणाची हत्या त्याच्याच आईने प्रियकराच्या मदतीने सुपारी देऊन केली. ज्या मुलाला लहानाचं मोठं केलं, तोच अनैतिक संबंधात अडसर ठरत असल्याच्या रागातून त्याचा जीव घेण्यात आला. दुसरीकडे, पुण्याच्या खेडमध्ये एका ६ वर्षांच्या निष्पाप चिमुरड्याचा गळा त्याच्या आईनेच घोटला. हृदयाला पीळवटणारी तिसरी घटना शिरूरची आहे जिथे केवळ ११ महिन्यांच्या यशच्या रडण्याला कंटाळून आणि दुसऱ्या लग्नाच्या विचारात तो अडथळा ठरेल या भीतीने, आईने त्याचे डोके ओट्यावर आपटून त्याला संपवले.


॥ सस्नेह निमंत्रण ॥

## माजी विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांचा सत्कार समारंभ



श्री/सौ. ______________________

आपणास विनंती की आम्ही माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आले आहे.

**गुरुवर्य प्राचार्य मनोहर सोनटक्के**

तसेच गुरुजनांचा सत्कार करण्याचे निश्चित केले आहे. आपणास विनंती करण्यात येते की, आपण कार्यक्रमास उपस्थित रहावे ही नम्र विनंती..

अध्यक्ष: **डॉ.श्री. दत्तात्रय रामचंद्र वाघमारे**, सं.कार्याध्यक्ष, श्री गुरुबुद्धीस्वामी शिक्षण प्रसारक संस्था, पूर्णा

प्रमुख वक्ते: **प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार**, प्रसिद्ध वक्ते व साहित्यिक, लातूर

सत्कार मुर्ती: **प्राचार्य मनोहर माधवराव सोनटक्के** व प्राध्यापक वृंद पूर्णा

प्रमुख उपस्थिती: **प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव शिंदे**, सायन्स कॉलेज, नांदेड

विनीत: **माजी विद्यार्थी बांधव**, गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा

रविवार, दि.१२ एप्रिल २०२६, सकाळी १०.०० ते ०५.००

स्थळ : पुरणमलजी लाहोटी सभागृह सायन्स कॉलेज, नांदेड


## Change In Name

My old name is **MOHMMAD AZIMODDIN** which I am changing as a New name **MOHAMMED AZEEMUDDIN MOHAMMED ISMAIL** Hence forth my all cores pondence will be done as per my new hame. Please Consider the same.

Contact:- MOHAMMED AZEEMUDDIN MOHAMMED ISMAIL
1-10-192 NIZAM COLONY Jangamwadi Road Taroda BK NANDED Maharashtra-431605


## पाहिजेत

जुना मोंढा, नांदेड येथील ड्रायफ्रूट दुकानात काम करण्यासाठी मुलांची आवश्यकता आहे.

पगार : रु. १५००० ते १८००० प्रति महिना देण्यात येईल. ठिकाण: फ्रेंड्स जर्दा स्टोअर जुना मोंढा, नांदेड

इच्छुक व गरजू उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधावा.

संपर्क (Contact) : 8688969755


## जाहीर प्रगटन

याद्वारे प्रगटन देण्यात येते की अर्जदार श्री जयप्रकाश रामचंद्र तिवारी रा. घर क्र. २-११-५४१, बजाज हॉस्पीटल, वजीराबाद, नांदेड ता. जि. नांदेड यांनी दिनांक २७.०२.२०२६ रोजी या कार्यालयात त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी आदेश होणेकरीता मागणी केली आहे.

जन्म झालेल्याचे नाव जयप्रकाश रामचंद्र तिवारी रा. घर क्र. २-११-५४१, बजाज हॉस्पीटल, वजीराबाद, नांदेड ता. जि. नांदेड यांचे राहते घर क्र. २-११-५४१, बजाज हॉस्पीटल, वजीराबाद, नांदेड ता.जि. नांदेड या ठिकाणी दिनांक ०३.०२.१९६३ या दिवशी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणे करीता आदेश होणेसाठी सदर कार्यालयात दिनांक २७.०२.२०२६ रोजी तहसिल कार्यालय नांदेड येथे अर्ज सादर केला आहे.

वरील जन्म दिनांकाबाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप या तहसिल कार्यालय नांदेड येथे सादर करावा. दिलेल्या मुदतीनंतर आक्षेपाचा विचार काला जाणार नाही.

दिनाक २६.०३.२०२६
स्थळ-नादेड

**तहसिलदार नांदेड करिता**

## Change In Name

My Old Name is **HINA PRAVEEN SHAIKH ANWAR HUSAIN** which now I am changing as New Name **HEENA PRAVEEN ABDUL GAFFAR** . Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - R/o. H.No. 1-7-910-3, Peer Nagar, Nanded 431605 Mo.No. 9860084336**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८




**जाहिरप्रगटन**

बिलोली येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर, ता. बिलोली जि. नांदेड यांचे न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९१/२०२६ — पुढील तारीख – ०८.०५.२०२६

अर्जदार : काशीनाथ पि. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – शेती व व्यापार, रा. बिलोली, ता. बिलोली जि. नांदेड.

विरुध्द.

गैरअर्जदारः ०१.सौ. शशीकलाबाई भ्र. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ७३ वर्षे, व्यवसाय – निरंक, रा. बिलोली विठ्ठल मंदीराजवळ ता. बिलोली जि. नांदेड.

०२.विश्वनाथ पि. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०३. रमेश पि. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०४. विजय पि. व्यंकटेशराव कुंचनवार, वय – ५७ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त शेती व व्यापार पासून रा. बिलोली ता. बिलोली जि. नांदेड.

०५. सौ. शकुंतलाबाई भ्र. दिलीप कुमार कोमवार, वय – ५५ वर्षे, व्यवसाय – घरकाम, रा. नांदेड मारोती मंदीराजवळ, शास्त्री नगर, भावसार चौक, नांदेड.

०६. सौ. शोभाबाई भ्र. गोरुंटीवार, वय – ५३ वर्षे, व्यवसाय – घरकाम, रा. निझामाबाद विनायक नगर, निझामाबाद.

विषय– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत..

ज्याअर्थी अर्जदार ह्यांनी मा. न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज दाखल केला असून त्यात अर्जदारांचे असे कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक ०१ ते ०६ हे **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार हा **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचा मुलगा असुन गैरअर्जदार क्रामंक ०२ हि **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांची पत्नी आहे गैरअर्जदार क्रमांक ०२ ते ०४ हे मुले आहेत व क्रमांक ०५ व ०६ ह्या विवाहीत मुली आहेत. **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचा मृत्यु दिनांक ०५.११.२०२० रोजी झाला. अर्जदाराने अर्जामध्ये असे कथन केले की, अर्जदार ह्यास **मयत व्यंकटेश हानमलू कुंचनवार** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सदरहू अर्जदार यांनी मा. न्यायालयात **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील अर्जदार हे **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस नाहीत असे कोणास समजाविण्याचे असेल अगर **सदर मयत** यांचे कोणी इतर वारस असल्यास त्यांनी या जाहिरप्रगटन प्रसिध्दीच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन किंवा वकीलामार्फत आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत काहीही हरकती न प्राप्त झाल्यास सदरहू अर्जदार हे **सदर मयत** यांचे वारस असल्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू **सदर मयत** यांचे कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/०४/२०२६ रोजी माझ्या सही व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

क. लिपीक, दिवाणी न्यायालय क. स्तर., बिलोली

आदेशावरून, 7/4/26, सहा. अधिक्षक, दिवाणी न्यायालय क. स्तर., बिलोली

## माउली सहकारी गृहनिर्माण संस्था म. पावडेवाडी (बु.) ता.जि. नांदेड

### विशेष अधिमंडळाची बैठक (फक्त सभासदा करिता)

माऊली सहकारी गृह निर्माण संस्था, पावडेवाडी (बु) ता. जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सन्माननिय सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेच्या विशेष अधिमंडळाची बैठक, संस्थेचे अध्यक्ष श्री सुभाष वानखेडे यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी ठिक २.०० वाजता संस्थेच्या कार्यालयात आयोजीत केली असून सभेतील विषय खालील प्रमाणे आहेत.

**सभेतील विषय**

१) मागील सभेचे प्रोसिडींग वाचन व मान्यता
२) शासकीय मोजणी नकाशाचे वाचन व मान्यता
३) शासकीय मोजणी नकाशाप्रमाणे प्लॉट नकाशात होणारे बदलावर चर्चा व इंजिनिअर कडून नकाशा तयार करुन घेऊन ग्रामपंचायत कार्यालय, वाडी (बु) यांचे मान्यतेस पाठविणे बाबत
४) अंतर्गत रस्ते तयार करण्या बाबत चर्चा
५) सभासदाकडील व्यवस्थापण खर्च वसुली बाबत
६) आयत्या वेळेचे विषय मा. अध्यक्षांच्या परवानगीने

सभेचे स्थळ : श्री सुभाष वानखेडे यांचे निवास स्थान शिवनेरी, कॅन्सर हॉस्पिटल / लॉयन्स नेत्रालयाजवळ, वासवीमाता मंगलकार्यालया समोर सिडको, नांदेड
सभेची वेळ : दुपारी ठीक २.०० वाजता
सभेचा दिनांक : मंगळवार दि. २८/०४/२०२६

अध्यक्ष / सचिव
माऊली सहकारी गृह निर्माण संस्था,
पावडेवाडी (बु) ता. जि. नांदेड

नोट : ठरलेल्या वेळी कोरम पूर्ण नाही झाल्यास ठरलेल्या वेळेची सभा अर्धा तासासाठी स्थगित करून परत सभा घेण्यात येईल त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## हिमायतनगर-भोकर महामार्गावर भीषण अपघात; २ ठार, १ जण गंभीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– हिमायतनगर ते भोकर या राष्ट्रीय महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे. सरसम गावाजवळ दि. १० एप्रिल रोजी भीषण अपघात झाला. यात २ तरुणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. तर अन्य एकजण गंभीर जखमी असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत.



सरसमपासून अर्धा किलोमीटर अंतरावर मोटारसायकल व अज्ञात वाहन (संशयित टाटा मॅजिक) यांच्यात जोरदार धडक झाली. या अपघातात लखन प्रदीप पांडे (वय २५, रा. सरसम ता. हिमायतनगर) यांचा जागीच मृत्यू झाला तर या अपघातात गंभीर जखमी झालेल्या अविनाश गणेश गोखले याचा नांदेड येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. तसेच रमेश गुंडेकर हे गंभीर जखमी असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत. हिमायतनगर ते भोकर या राष्ट्रीय महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे. सरसम ते पोटा या दरम्यान अपघाताची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पूर्वीच्या अपघाताचे दुःख विसरले नाही तोच दुसरा अपघात झाल्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी हिट अँड रन स्वरूपाचा अपघात असल्याची शक्यता व्यक्त केली जात असून, अपघातानंतर संबंधित वाहन घटनास्थळावरून पसार झाल्याचे समजले.

या घटनेची हिमायतनगर पोलिसांना माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, फरार वाहन व चालकाचा शोध घेण्यासाठी तपास सुरू आहे. या अपघातामधील मयत झालेल्या अविनाश गोखले व लखन पांड्या यांच्यावर दि. ११ एप्रिल रोजी दुपारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सरसम ते सोनारी आणि खडकी फाटा या दरम्यानच्या मार्गावर वारंवार अपघात होत असल्याने हा मार्ग धोकादायक बनला आहे.

गेल्या दशकात या परिसरात शेकडो अपघात होऊन अनेकांना जीव गमवावा लागला आहे. सिमेंट रस्त्यावर मोठ्या प्रमाणात भेगा पडल्या आहेत. या संदर्भात उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. वाहतूक नियंत्रण व सुरक्षेच्या उपाययोजनांचा मोठा अभाव आहे, त्यामुळे या भागात नेहमी अपघातांचे प्रमाण वाढत आहे.

## माहूर दत्तशिखर येथे सत्संग व महापूजा

**माहूर (प्रतिनिधी)** –श्रीक्षेत्र माहूर येथील दत्तात्रय संस्थान शिखर येथे दि. १९ एप्रिल रोजी सत्संग, षोडशी महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

महंत परमपूज्य श्री श्री श्री १००८ मधुसूदन भारती, गुरु अच्युत भारती महाराज (मालक) यांचे ४ एप्रिल रोजी महानिर्वाण झाले. त्यानंतर महंत श्री श्री श्री १००८ डॉ. धनेश्वर भारती गुरु मधुसूदन भारती महाराज यांची उत्तराधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली. या पार्श्वभूमीवर अक्षय तृतीया १९ एप्रिल रोजी आनंदलीन महंत मधुसूदन भारती महाराज यांच्या स्मरणार्थ षोडशी महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. १९ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजल्यापासून तीर्थस्थापना, दत्तनामाचा गजर, सत्संग, षोडशी महापूजा, महाप्रसाद, आनंद दत्त १२८ सवा खंडी महापूजा व दि.२० एप्रिल रोजी सकाळी काकडा आरतीने सांगता होईल.

## क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त प्रभात फेरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सकाळी ७.३० ते ९ या वेळेत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्यावतीने स्व. वसंतराव नाईक चौक ते महात्मा जोतीबा फुले यांच्या पुतळ्यापर्यंत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रभातफेरीत शासकीय मुलांचे व मुलींचे वसतिगृह तसेच महाविद्यालयीन सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला होता. प्रभातफेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून तसेच शैक्षणिक संदेशपर कविता सादर करून सामाजिक जागृतीचा प्रभावी संदेश दिला. यानंतर महात्मा जोतीबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना व मान्यवरांना द्विशताब्दी वर्षानिमित्त शुभेच्छा दिल्या. तसेच समग्र वाड्.मय ग्रंथ भेट म्हणून प्रदान केले. कार्यक्रमाच्या शेवटी नांदेड जिल्ह्याचे सहाय्यक संचालक सचिन खुणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## नांदेड विभागात तिकीट तपासणी दरम्यान प्रवाशांवर दंडात्मक कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात शुक्रवार, दि. १० एप्रिल रोजी व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. प्रवाशांनी वैध तिकिटासह प्रवास करावा, अनियमित प्रवासास आळा घालावा. तसेच रेल्वे नियमांविषयी जनजागृती व्हावी या उद्देशाने ही मोहीम हाती घेण्यात आली.



या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान एकूण ९५४ अनियमित प्रवासाची प्रकरणे आढळून आली. विनातिकीट प्रवास ६८१ प्रकरणे - वसूल रक्कम : ४ लाख ७९ हजार २०५ रुपये वसूल करण्यात आले. अनियमित प्रवास १७७ प्रकरणे - वसूल रक्कम १ लाख ५ हजार १८५, नोंद न केलेले सामान ९६ प्रकरणे उघडकीस आली आहेत. या मोहिमेदरम्यान एकूण ५ लाख ९९ हजार १४० रुपये इतकी रक्कम वसूल करण्यात आली.

या तिकीट तपासणी मोहिमेत १६८ रेल्वे कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यामध्ये २७ तिकीट तपासणी पथक सदस्य, १२९ वाणिज्य व प्रवासी सुविधा विभागातील कर्मचारी आणि १२ स्थानक कर्मचारी उपस्थित होते. विभागातील विविध स्थानके व गाड्यांमध्ये ही विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. तिकीटविना व अनियमित प्रवासास आळा घालण्यासाठी अशा प्रकारच्या विशेष तपासणी मोहिमा नांदेड विभागाकडून नियमितपणे राबविण्यात येतात, ज्यामुळे वैध तिकिटांसह प्रवास करणाऱ्या प्रवाशांना न्याय्य व सुरक्षित प्रवासाचे वातावरण उपलब्ध होते. प्रवाशांनी दंड व गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटासह प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

## खंजर घेऊन फिरणाऱ्या दोघांना अटक

**नांदेड (प्रतिनिधी)** –कोम्बिंग ऑपरेशन दरम्यान पोलिसांनी भाग्यनगर रोडवर खंजर घेऊन फिरणाऱ्या दोन जणांना अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी रात्री ११ वाजल्यापासून ते शनिवारी पहाटेपर्यंत पोलिसांनी कोम्बिंग ऑपरेशन राबविले. या ऑपरेशनमध्ये शहरातील पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व पोलीस कर्मचारी तसेच शहर वाहतूक शाखेचे पोलीस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. पोलिसांनी रेकॉर्डवरील गुन्हेगारांची अचानक तपासणी केली असून त्यांच्या हालचालींची पोलिसांनी माहिती गोळा करणे सुरु केले आहे. पहाटेच्या सुमारास शहर वाहतूक शाखेचे सपोनि. भागवत नागरगोजे व पोलीस कर्मचारी गस्त घालीत गुरविंदरसिंग गंगाधरसिंग येवते (२७) रा. गाडीपुरा व हरप्रितसिंघ केशरसिंघ लांगरी (३५) रा.शहीदपुरा, नांदेड यांना अटक करून त्यांच्याकडून दुचाकी व खंजर जप्त केले आहे.

## स्वारातीम विद्यापीठात आरोग्य दिन शिबीर संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)** –येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 'विद्यार्थी विकास विभाग'तर्फे ७ एप्रिल 'जागतिक आरोग्य दिना' निमित्त आयोजित विशेष आरोग्य शिबिराचा ९ एप्रिल रोजी विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात यशस्वी समारोप झाला. या शिबिराचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.



शिबिरात वरिष्ठ जागतिक आरोग्य सल्लागार डॉ. मनीषा जायभाये (जीवन संजीवनी वेलनेस अँड फिटनेस सेंटर, बीड), आरोग्य सल्लागार राणी सानप तसेच प्रा. डॉ. अजय सूर्यवंशी यांच्या सहकारी पथकाने सहभाग घेतला. यावेळी सहभागींची प्राथमिक शारीरिक तपासणी करण्यात आली. तसेच पोषण, फिटनेस आणि व्यायाम याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. आधुनिक जीवनशैली लक्षात घेऊन बी.एम.आय. तपासणीही मोफत करण्यात आली.

'मेडिसिन-फ्री' आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश देत विद्यापीठ परिसरात आरोग्याविषयी जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सकाळपासूनच तपासणीसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी दिसून आली. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर व रा.सो.यो संचालक डॉ. मारोती गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पंढरीनाथ रोडे यांचे निधन

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडच्या टेक्सकॉम टेक्सटाइल कंपनीतील सेवानिवृत्त कर्मचारी पंढरीनाथ कडाजी रोडे (वय ८२ वर्षे) यांचे ११ एप्रिल रोजी निधन झाले.



स्व. पंढरीनाथ रोडे यांच्या पार्थिव देहावर शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी सायं. ६ वाजता नांदेडच्या सिडको वसाहतीतील वैकुंठधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, एक मुलगी, जावई व नातवंडे असा परिवार आहे.

## चिखलवाडी रस्त्याच्या कामातील विलंबामुळे नागरीक संतप्त

**नांदेड (प्रतिनिधी)** –चिखलवाडी येथील मुख्य रस्त्याचे काम मागील तीन महिन्यांहून अधिक काळ सुरू असून, अद्याप पूर्णत्वास गेलेले नाही. जुना रस्ता फोडून नवीन रस्ता तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले असले तरी कामाची गती अत्यंत मंद असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

माहितीनुसार रस्त्याचे काम करताना एक ते दीड फुट खोदकाम करून गिट्टी व माती टाकून दबाई करण्यात आली आहे. मात्र त्यानंतरचा सिमेंट कॉंक्रिटचा मुख्य टप्पा अद्याप पूर्ण झालेला नाही. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नाल्यांचे कामही प्रलंबित आहे. सध्या रस्ता खोदलेल्या अवस्थेतच ठेवण्यात आल्यामुळे परिसरातील दुकानदारांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुकानांपर्यंत ग्राहक पोहोचणे कठीण झाले असून, व्यवसायावर परिणाम होत आहे. तसेच रस्ता अरुंद झाल्याने वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे नागरिकांना रोज इजा सहन करावी लागत असून, अनेकजण घसरून पडण्याच्या घटना घडत आहेत. छोट्या रस्त्यावर वाहनांची एकमेकांना घासाघीस होत असल्याने वादविवादही वाढले आहेत.



या सर्व परिस्थितीमुळे चिखलवाडीतील नागरीक व दुकानदार संतप्त झाले असून, रस्त्याचे काम पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त पाणीपुरवठा करा -शीला भवरे



**नांदेड (प्रतिनिधी)** –प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने नांदेड शहरामधील पाणीपुरवठा दि. १३ व १४ एप्रिल रोजी सुरळीत करावा, अशी मागणी माजी महापौर तथा भाजपच्या विद्यमान नगरसेविका शीला किशोर भवरे यांनी आयुक्तांकडे केली आहे.

१४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती दिवशी दैनंदिन वापरापेक्षा अधिकच्या पाण्याची आवश्यकता नांदेड शहराला पडू शकते. त्यामुळे वेळापत्रकात सुरळीतपणा ठेवून दोन्ही दिवशी शहरात मुबलक पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी शीला किशोर भवरे यांनी केली आहे.

## क्रांतीसूर्य जोतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध ठिकाणी मानवंदना

**नांदेड (प्रतिनिधी)** –स्त्री शिक्षणाचे प्रणेते जोतीबा व सावित्रीबाई या फुले दाम्पत्यांच्या विचार व कार्यामुळेच आधुनिक विज्ञान युगात महिला व बहुजन समाजातील युवकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले. नांदेड जिल्ह्यात विविध कार्यालये व सामाजिक संघटनांच्यावतीने दि. ११ एप्रिल रोजी क्रांतीसूर्य जोतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवून मानवंदना देण्यात आली.

### महात्मा फुल्यांच्या कार्यामुळेच आजची महिला सक्षम बनली -आ. श्रीजयाताई चव्हाण



डॉ. आंबेडकर फाउंडेशन सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार व त्यांच्या सहकार्याने इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय सिडको नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय परिसंवाद, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी विचारपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र चव्हाण, बीजभाषक डॉ. अरुण वाहूळ, प्राचार्य डॉ. जी. एन. शिंदे, प्राचार्य. डॉ. दुर्गेश रवंदे, डॉ. शंकर विभुते, समन्वयक डॉ. एस. बी. मिर्झा, डॉ. जी. एस. पाटील, डॉ. भागवत पस्तापुरे उपस्थित होते.

आ. चव्हाण पुढे म्हणाल्या की, महात्मा फुल्यांनी प्रचंड त्याग केला. सावित्रीआईला सर्वप्रथम साक्षर करून, एक स्त्रीने शिक्षण घेतले तर असंख्य महिला साक्षर होतील हा त्यांचा ध्यास होता. आज संसदेत, विधानभवनात आणि वेगवेगळ्या क्षेत्रात माझ्यासारख्या असंख्य मुली ताठ मानेने उभे आहेत. त्याचे संपूर्ण श्रेय क्रांतिकारक महात्मा जोतीबा फुले यांनाच जाते असे त्या म्हणाल्या. प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमांची माहिती दिली. शेतकऱ्यांच्या दुःखाचे मूळ कारण महात्मा जोतीबा फुल्यांनी दीडशे वर्षांपूर्वी सांगितले, पण आजही आपण त्यांना दुःखमुक्त करू शकलो नाही, ही खंत त्यांनी यावेळी व्यक्त केली.

शुभेच्छा संदेश देताना यशवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. एन. शिंदे म्हणाले की, प्रस्तुत महाविद्यालयाने अल्पावधीतच विविध उपक्रमांची अंमलबजावणी करून आपली गुणवत्ता कायम राखली. शिस्त आणि कष्ट यशस्वी होण्याचे मूलमंत्र आहेत असे ते यावेळी म्हणाले.

राष्ट्रीय परिसंवादाचे बीजभाषण करताना अभ्यासक डॉ. अरुण वाहूळ म्हणाले की, तत्कालीन समाजसुधारकांच्या विचारात जरी मतभेद असलेतरी एकमेकांविषयी द्वेषभावना नव्हती. लोकमान्य टिळकांची जमानत महात्मा फुले यांनी घेतली होती. दुर्दैवाने आपण महापुरुषांना जातीच्या चौकटीत बंदिस्त केले, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शंकर विभुते यांनी तर आभार प्रा. डॉ. एस. बी. मिर्झा यांनी मानले. दुपारच्या सत्रात परिसंवादाने रंगत आणली तर सायंकाळच्या सत्रात सांस्कृतिक कार्यक्रमांनी सभेची उंची वाढवली. वेगवेगळ्या समितीने आपापली जबाबदारी चोखपणे पार पाडल्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला अशी भावना प्राचार्यांनी व्यक्त केली.



**स्वारातीम विद्यापीठात जोतीबा फुले यांची जयंती साजरी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र येथे शनिवार, दि.११ एप्रिल रोजी महात्मा जोतीबा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. ज्ञानेश्वर पवार, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. सुनिता पाटील, उपकुलसचिव डॉ. रवी सरोदे, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, सहा. कुलसचिव अनिरुद्ध राहेगावकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, अधीक्षक के. डी. पाटील, सिस्टीम एक्स्पर्ट शिवलिंग पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी महात्मा जोतीबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.



**महापालिकेच्यावतीने जोतीबा फुले यांना अभिवादन**

स्त्री शिक्षणाचे जनक आणि थोर समाजसुधारक क्रांतीसूर्य महात्मा जोतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्यावतीने दि.११ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शहरातील औद्यागिक प्रशिक्षण केंद्राजवळील महात्मा जोतीबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास महापौर कविता मुळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर दीपकसिंग रावत आणि आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनीसुद्धा जोतीबांना अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, माहिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, भाजपा महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. महात्मा जोतीबा फुले यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी उघडी करून समाजात समतेचा विचार रुजवला. त्यांचे विचार समाजाला आजही दिशा देणारे आहेत, असे विचार यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमास पालिकेतील नगरसेवक, विविध विभागाचे प्रमुख अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.



**संभाजी ब्रिगेडच्यावतीने जोतीबा फुले यांना अभिवादन**

थोर समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले यांच्या जन्मोत्सवा-निमीत्त नांदेड येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून संभाजी ब्रिगेडच्यावतीने अभिवादन करण्यात आले.

महात्मा जोतीबा फुले व सावित्रीबाई फुले या दाम्पत्यांनी स्त्री शिक्षणाचे कार्य केले त्यामुळेच त्यांना स्त्री शिक्षणाचे जनक असे म्हटले जाते, असे मत संभाजी ब्रिगेड विभागीय अध्यक्ष संकेत पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे, कमलेश कदम, परमेश्वर पाटील, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्षा कल्पना चव्हाण, सुमित्रा वडजकर, अर्चना होगे, अविनाश शिंदे, किरण वानखेडे, मोहन शिंदे, कुंडलिक शिंदे, दाजीबा पावडे, ज्ञानेश्वर हंगरगे, सुनील पाटील, सुमीत जाधव, दीपक गुरव व इतरांची उपस्थिती होती.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com